म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क. 360

॥ श्री ॥

# नेपाळचा प्रवास.



महाराजाधिराजांनीं भेटीच्या प्रसंगीं दिलेली सुवर्णालंकृत कुकडी.

संपतराव गायकवाड,

एफ. आर. एस. एल.; एफ. आर. जी. एस.; बार-ॲट-लॉ,

मुंबई.

१९२८ इ.–संवत १९८५.

किंमत ८ आणे.

REFBK-0003793

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ....३८८३..
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

॥ श्री ॥

# नेपाळचा प्रवास

संपतराव गायकवाड,

एफ. आर. एस. एल.; एफ. आर. जी. एस.; बार-ॲट-लॉ,

REFBK-0003793

मुंबई,

सन १९२८ इ.–सवंत १९८५.

किंमत ८ आणे.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ठाणा (इ.)

.हें पुस्तक रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे, यांनीं आपल्या ' इंदुप्रकाश '
छापखान्यांत नं. ३८० गिरगांव रोड, मुंबई येथें छापिलें, आणि
श्रीमंत संपतराव गायकवाड यांनीं, मलबारहिल, जयमहाल, येथें प्रसिद्ध केलें.

या ग्रंथासंबंधाचे सर्व हक्क ग्रंथकारांनीं राखून ठेविले आहेत.

राजमाता

श्रीमंत महाराणी गजराराजेसाहेबा शिंदे,

संस्थान- ग्वाल्हेर,

यांस,

त्यांचा प्रेमळ स्वभाव, शीलसंपन्नता, स्वधर्मनिष्ठा,

व ज्ञानसंपादनाची हौस इत्यादि गुणांच्या अभिनंदनार्थ

हें लहानसें प्रवासवर्णनाचें पुस्तक

प्रेमाशीर्वादपूर्वक

अर्पण करण्यांत येत आहे.

संपतराव गायकवाड

# प्रस्तावना.

निरनिराळ्या देशांत प्रवास करून तेथील सृष्टिसौंदर्य व लोकस्थिति ाहणें, शिकार करणें, वगैरे गोष्टींची मला फार आवड असल्यामुळें, ुरोप, अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, जपान, इत्यादि भुभागांचें वलोकन करण्यांत मी माझ्या आयुष्याचे बरेच दिवस घालविले आहेत. ांहीं वर्षांपूर्वी मी आफ्रिकेंत शिकारीस गेलों होतों, त्या प्रसंगाचें वर्णन आफ्रिकेंतील शिकार" या नांवाच्या पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें आहे. ानंतर १९२५ सालीं मला नेपाळांत प्रवास करण्याचा योग आला व ा प्रवासांतील माझे अनुभव व्याख्यानरूपानें बडोदें येथील 'सहविचा- ्णी' सभेचा अध्यक्ष या नात्यानें त्या सभेंत मी पूर्वी एकदां सांगितले ाते व हें माझें व्याख्यान पुस्तक रूपानेंही प्रसिद्ध झालेलें आहे. पुढें हें ्याख्यान वाढवून व त्यांत नेपाळासंबंधाची अवांतर माहिती समा- ्ष्ट करून त्या विषयावर एक लहानसें पुस्तक लिहावें असा विचार ाझ्या मनांत आला, व तो अंमलांत आणण्यासाठीं नेपाळासंबंधानें पलब्ध असलेले अनेक इंग्रजी ग्रंथ मिळवून त्यांच्या आधारानें स्तुत पुस्तक लिहून तयार केलें. आज सबंध जगांत हिंदु लोकांचें पाळ हें एकच स्वतंत्र राज्य असल्यामुळें त्यासंबंधाची शक्य तेवढी ाहिती समजून घेण्याची जिज्ञासा पुष्कळ लोकांच्या मनांत उत्पन्न ालेली आहे, व प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनानें ती अंशतः तरी पूर्ण

होईल असें मला वाटतें. नेपाळासंबंधाची बहुतेक सर्व महत्त्वाची माहिती या पुस्तकांत संगतवार रीतीनें दिलेली असून, कांहीं स्थलांचे फोटो देऊन पुस्तकाची उपयुक्तता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. हा अल्प प्रयत्न माझ्या देशबांधवांच्या आदरास पात्र झाला असें दिसून आल्यास मला मोठी कृतार्थता वाटेल हें सांगावयास नकोच.

हें पुस्तक तयार करण्याचे कामीं, डॉ.बी.भट्टाचार्य एम.ए., पी.एच.डी,डायरेक्टर,ओरिएंटल इन्स्टिट्यूट,बडोदें, यांनीं देखाव्याच्या प्लेटस् देऊन, तसेंच बडोदें विद्याखात्यांतील इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्ण भास्कर जोशी बी. ए., बी. एच. एस. यानीं सांगितलेलें काम वेळच्या-वेळीं खुषीनें करून देऊन या पुस्तकप्रकाशनाचे कामीं जी मदत केली, तीबद्दल मी या उभयतांचा फार अभारी आहे. तसेंच सदर पुस्तक वेळेवर छापून देण्याचे कामीं इंदुप्रकाश छापखान्याचे मालक श्रीयुत दा. सां. यंदे यानीं चांगली काळजी घेतली याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

यापुढें जमल्यास, ब्रह्मदेश, दक्षिण अमेरिका, आस्ट्रेलिया वगैरे जे अनेक प्रदेश मी पाहिले आहेत त्यासंबंधाची माहितीचे ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें योजिलें असून, दुसऱ्या एका ग्रंथांत शिकारीविषयींची विस्तृत व मनोरंजक माहिती देण्याचा माझा विचार आहे.

जयमहाल, मलबारहिल, मुंबई नं. ६<br>ता. २८।८।२८<br>संवत १९८५, श्रावण शुद्ध १२

संपतराव गायकवाड.

## प्रस्तुत पुस्तक लिहितांना ज्या ग्रंथांचा उपयोग करण्यांत आला त्यांची यादी.


1. *Bhagvanlal Indraji.*—Twenty-three Inscriptions of Nepal, Bombay 1885.
2. *Wright W.*—History of Nepal 1888.
3. *Temple Sir R. C.*—Hyderabad, Kashmir, Sikkim and Nepal.
4. *Bendall C.*—Catalogue of Palm leaf MSS in the Nepal Durbar Library (Introduction).
5. *Bendall, C.*—Catalogue of Buddhist Sanskrit MSS in the University Library Cambridge.
6. *Shastri Harprashad.*—Brahadha Ramapurana.
7. *Shastri Harprashad.*—Catalogue of Palm leaf and Paper MSS in the Durbar Library Nepal *2* Vols.
8. *Hunter W. W.*—Life of B. H. Hodgson, British Resident in the Court of Nepal London 1896.
9. *Digby.*—Nepal and India an episode in Foreign Office administration London 1890.

10. *Percy Brown,*—Picturesque Nepal.

11. *Ofield H. A.*—Sketches from Nepal 2 Vols. London 1880.

12. *Bendall C.*—Journey to Nepal.

13. *Hodgson B. H.*—On the Languages Literature and Religion of the Budhas of Nepal & Bhutan.

14. *Bruce.*—Twenty years in the Himalayas.

15 *Lander S.*—Tibet and Nepal.

16. ज. र. आजगांवकर—नेपाळ वर्णन.

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठांक |
|---|---|
| १ भूगोल | १ |
| २ नेपाळचा इतिहास | ५ |
| ३ गुरखा घराणें | १४ |
| ४ नेपाळांतील धर्म | १७ |
| ५ नेपाळांतील हिंदू लोक | २० |
| ६ भाषा | २१ |
| ७ खाद्यपेय | २२ |
| ८ सण आणि उत्सव | २४ |
| ९ विवाहपद्धति | २९ |
| १० शासनपद्धति | ३४ |
| ११ पोषाक | ३५ |
| १२ नेपाळचा प्रवासमार्ग | ३९ |
| १३ प्रमुख शहरें व प्रेक्षणीय स्थळें | ४१ |
| १४ अर्वाचीन नेपाळ | ४८ |
| १५ माझा नेपाळांतील अनुभव | ५५ |
| १६ नेपाळचे प्राईम मिनिस्टर व त्यांचे पुत्र व कन्या | ७१ |



महाराजा सर चंद्र समशेरजंग बहादूर राणा.

जी. सी. बी., जी. सी. एस.आय., जी. सी. एम. जी. इ.

प्राईम मिनिस्टर नेपाळ.



सर मोहन समशेरजंग बहादुर राणा.

के. सी. आय. ई. मन्याबार जनरल.



# नेपाळचा प्रवास

## १ भूगोल

नेपाळ देश हा एक मोठा चमत्कारिक भूप्रदेश आहे. या देशाच्या उत्तरेकडील बाजूस हिमालय पर्वत लागून असल्यामुळें—किंबहुना हा सर्व देशच हिमालयाच्या उतरणीवर असल्यामुळें—हिमालयाशीं त्याचें पुष्कळ साम्य दिसून येतें. मोठमोठीं घनदाट अरण्यें, तराईसारखे दलदलीचे रानटी प्रदेश, व्याघ्र—अस्वलांसारखे हिंस्र पशु, गौरीशंकरासारखीं अत्युच्च गिरिशिखरें, उंचवट्यावरून सपाट प्रदेशाकडे मोठ्या वेगानें वाहत जाणाऱ्या नद्या आणि प्रचंड धबधबे, यांचें जिकडे तिकडे वैपुल्य दिसून येतें. मानवशरीरशास्त्रज्ञांस व जातिशास्त्रज्ञांस असंख्य जंगली मानववंश व त्यांच्या विचित्र चालीरीति; पुराणवस्तुशास्त्रज्ञांस व इतिहाससंशोधकांस अनेक विस्तीर्ण अरण्यें व गुंतागुंतीचे ऐतिहासिक प्रश्न सोडविण्यास साहाय्यभूत होणारीं प्राचीन स्थलें; त्याचप्रमाणें भूगर्भशास्त्रज्ञ, प्राणिशास्त्रज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ, यांसही शेंकडों वर्षे पुरण्याइतकी सामग्री, या नेपाळ देशांत सहज सांपडण्यासारखी आहे.

एखाद्या मोठ्या खंडांतील निरनिराळ्या देशांत ज्या निरनिराळ्या हवा दृष्टोत्पत्तीस येतात, त्या सर्व हवा एकट्या नेपाळ देशांत अनुभवितां येतात. उत्तरबिहार प्रांतांतील सपाट प्रदेशांतल्या उन्हाळ्यांतली

असह्य उष्णताही नेपाळांत आढळते व हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर गेलें असतां उत्तरध्रुवाकडील थंड हवेचाही अनुभव तेथें घेतां येतो. हिंदुस्थानवासीयांस नेपाळ ही एक चमत्कारिक व नावीन्यपूर्ण भूमी वाटते. नेपाळचा इतिहासही असाच चमत्कारिक आहे व त्या इतिहासाशीं निगडित झालेली प्रत्येक गोष्ट–तेथील राज्यकारभार, तेथील लोक, त्या लोकांच्या चालीरीति, त्यांचे धर्म, त्यांचें तत्त्वज्ञान, त्यांचे उत्सव, आणि त्यांच्या भाषा–हें सर्वच कांहीं चमत्कारिक आहे. नकाशांत नेपाळ हा जरी हिंदुस्थानचाच एक भाग दिसतो, तरी हिंदुस्थानच्या इतर भागांशीं त्याचें फारच थोडें साम्य आहे. खरोखरच हा देश ह्मणजे पडद्याआड असलेला एक देश आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

नेपाळच्या उत्तरेस हिमालय पर्वताची रांग व तिबेट देश; पूर्वेस सिकिम आणि दार्जिलिंग; पश्चिमेस कुमांव प्रांत व दक्षिणेस संयुक्त प्रांतांतील [ U. P. ] व बिहार प्रांतांतील उत्तरेकडील जिल्हे असून, त्याचें क्षेत्रफळ सुमारें ५४,००० चौरस मैल व लोकसंख्या सुमारें ४०,००,००० आहे. नंदादेवी ( २५७०० फूट ), धवलगिरी, ( २६८२६ फूट ), गोसाईस्थान ( २६३०५ फूट ) आणि कांचनगंगा ( २८१४६ फूट ). या हिमालयाच्या चार उंच शिखरांपासून निघालेल्या डोंगरपठारांमुळें नेपाळ देशाचे तीन स्वाभाविक विभाग झालेले आहेत. या प्रत्येक विभागाचें नांव, त्यांतून वाहणाऱ्या नदीवरून त्याला प्राप्त झालेलें आहे. उदाहरणार्थ, पश्चिमेकडील विभागांतून गोगरा नदी वाहते व ह्मणून त्याला गोगराकांठचा उंचवट्याचा प्रदेश; मध्यविभागांतून गंडकी नदी वाहते ह्मणून त्याला गंडकीकांठचा उंचवट्याचा प्रदेश, व तिसऱ्या विभागांतून कोसी नदी वाहते ह्मणून त्याला कोसीकांठचा प्रदेश, अशीं नांवें देण्यांत आलेलीं

आहेत. या तीन विभागांशिवाय खुद्द नेपाळ हा एक स्वतंत्र विभाग असून त्यांत काटमांडू हें राजधानीचें शहर आहे. हा विभाग कोशी आणि गंडक या नद्यांच्या मध्यें असून, गोसाईस्थान शिखरापासून निघालेल्या डोंगरपठाराच्या दोन फांट्यांमुळें तो बनलेला आहे. ही दरी [ Valley ] समुद्रसपाटीपासून ४७०० फूट उंच असून, तिला वाघमती नदीच्या पाण्याचा भरपूर पुरवठा होतो. विष्णुमती या नांवाची दुसरी एक नदी या वाघमती नदीस मिळाली आहे. या विभागांत पाटण आणि भाटगांव हीं जुनीं ऐतिहासिक शहरें असून, तेथें एका काळीं परस्परविरोधी अशा दोन राजसत्ता अस्तित्वांत होत्या. नेपाळांत सरोवरांचा बहुतेक अभावच आहे., फक्त पोखरा प्रांतांत कांहीं सरोवरें असल्याचें समजतें.

नेपाळांतील सृष्टिसौंदर्य अत्यंत विविध प्रकारचें आहे. नेपाळचा जो भाग ब्रिटिश हद्दीस लागून आहे तो वालुकामय असून चांगला लागवडीस आणलेला आहे. याच्यापलीकडील भाग जुनाट अरण्यानें व्यापलेला आहे. हें जंगल इतकें दाट आहे कीं, भरदिवसादेखील त्यांत सूर्यप्रकाशाचा संचार होऊं शकत नाहीं; व कित्येक ठिकाणीं तर, झुडपांची गर्दी व एका वृक्षावरून दुसऱ्या वृक्षावर वाढत गेलेल्या वेली यांच्यामुळें ह्या जंगलांत प्रवेश करणें देखील अशक्य झालें आहे. हिंवताप, दलदल, वाळू आणि पाणथळ यांचें हा प्रदेश वास्तव्यस्थान असल्यामुळें व उष्णप्रदेशांत सांपडणाऱ्या सर्व प्रकारच्या वनपशूंचा येथें सुळसुळाट असल्यामुळें हा टापू मनुष्यवस्तीस अगदीं नालायक झाला आहे. या जंगली प्रदेशाच्या पलीकडे कमी उंचीच्या पर्वतश्रेणी असून त्या वृक्षसमुदायानें व्यापलेल्या आहेत. या पर्वतांवरून लहान लहान नद्यांचे सुंदर प्रवाह वाहत असतात व कांहीं ठिकाणीं धबधबेही दृष्टीस पडतात. या पहाडांच्या उत्तरेकडील बाजूंपेक्षां

त्यांच्या दक्षिणेकडील बाजूंवर झाडझाडोरा अधिक आहे. खुद्द नेपाळच्या खोऱ्यांत जातांना जें शेवटचें डोंगरपठार ओलांडावें लागतें तें ओलांडतांना, नेपाळच्या उत्तरेकडील बर्फाच्छादित उच्च गिरिशिखरांचा देखावा एकदम डोळ्यांपुढें उभा राहतो. गोसाईंस्थान, धवलगिरि, गौरीशंकर आणि एवरेस्त हीं शिखरें एकाहून एक उंच असून तीं इतकीं भव्य, सुंदर आणि विस्तृत आहेत कीं, त्यांच्या आसमंतात् प्रदेशाचा देखावा व त्या दृश्याचें वन्यसौंदर्य यांच्या अवलोकनानें प्रेक्षक अगदीं वेडा होऊन जातो.

हिमालय पर्वत ओलांडून नेपाळमधून तिबेटांत जाण्यासाठीं अनेक घांट असून वर्षांतून बाराही महिने ते बर्फानें आच्छादिलेले असतात. नंदादेवी आणि धवलगिरी या दोन शिखरांच्या मध्यें थाकलाखोर या नांवाचा घांट असून गोग्रा नदीस मिळणाऱ्या कर्णाळी नामक नदीच्या कांठानें तो तिबेटांत गेला आहे. मस्तांग या नांवाचा दुसरा एक घांट असून तो धवलगिरीपासून २० मैलांवर आहे. मुक्तिनाथ या नांवाचें जें प्रख्यात तीर्थस्थान आहे तें या घांटाच्या उत्तरेस असून तेथें मिठाचा मोठा व्यापार चालतो. तिसरा घांट केरंग हा गोसाईंस्थान शिखराच्या पश्चिमेस आहे व चौथा घांट कुटी हा पूर्वेस आहे. हे दोन्ही घांट काटमांडू शहराच्या जवळ असल्यामुळें व्यापारी व यात्रेकरू लोक याच घांटाचा उपयोग अधिक करितात. नेपाळची राजधानी काटमांडू आणि तिबेटची राजधानी ल्हासा, यांच्या दरम्यान होणारें दळणवळण केरंग घाटानें होतें. काटमांडू येथून तिबेटांत जाण्याचा जवळचा रस्ता कुटी घांटांतून आहे, परंतु त्याचा चढाव फार बिकट असल्यामुळें त्या मार्गानें घोडीं जाऊं शकत नाहींत. हटिया नामक पांचवा घांट कुटी घांटापासून ५० मैल आहे. सहावा घांट वालांग या नांवाचा असून तो नेपाळच्या पूर्वसरहद्दीवर कांचनगंगा शिखराच्या पश्चिमेस आहे.

# २ नेपाळचा इतिहास

नेपाळचा प्राचीन इतिहास बहुतेक अज्ञातच आहे. शिलालेख किंवा वाङ्मय यांच्या आधारानें, निश्चयात्मक व अत्रुटित असा नेपाळचा पूर्वेतिहास उपलब्ध होऊं शकत नाहीं. हिंदु लोकांच्या वंशावळी आणि बौद्धधर्मीय लोकांचें स्वयंभू पुराण यांतून जरी नेपाळचा कांहीं इतिहास व तेथील राज्यस्थापनेचा वृत्तांत सांपडतो, तरी त्यांत दंतकथांचा व पौराणिक गोष्टींचा येवढा मोठा भरणा आहे कीं त्या मिश्रणांतून नेपाळचा विश्वसनीय इतिहास वेगळा काढणें अगदीं अशक्य आहे. वंशावळी आणि स्वयंभूपुराण यांतील गोष्टी अविश्वसनीय वाटण्याचें कारण हें कीं या वंशावळी मागाहून तयार केलेल्या आहेत व स्वयंभूपुराण हा ग्रंथ बराच अर्वाचीन, सुमारें अकराव्या शतकांतला आहे. तथापि नेपाळच्या हल्लींच्या स्थितीवर या प्राचीन इतिहासामुळें बराच प्रकाश पडण्यासारखा असल्यामुळें व तेथील लोकांच्या चालीरीती आणि आचारविचार हीं समजून घेण्यास हा इतिहास फार उपयुक्त असल्यामुळें त्यांतील ठळक गोष्टींचा येथें निर्देश करणें जरूर आहे.

अथर्वपरिशिष्ट, स्कंदपुराणांतर्गत नागरखंड, सह्याद्रिखंड आणि रेवाखंड, देवीपुराण, गरुडपुराण, जैन हरिवंश, वाराहीतंत्र, वराहमिहिराची बृहत्संहिता, हेमचंद्रकृत स्थविरावलिचरित्र व अशाच प्रकारचे आणखी कांहीं ग्रंथ यांत नेपाळचा उल्लेख सांपडतो. स्वयंभूपुराणांत असें सांगितलें आहे कीं, प्राचीन काळीं नेपाळ प्रांत हें एक मोठें सरोवर होतें, व त्याला कालियाह्रद असें नांव होतें. मंजुश्री या नांवाच्या एका चिनी बौद्ध धर्मगुरूला एके दिवशीं असा दृष्टांत झाला

कीं, स्वयंभू बुद्धदेव हा या सरोवरांतील एका कमलांत अग्निज्वालारूपानें अवतरला आहे. असा दृष्टांत होतांच तो धर्मगुरु, आपल्या दोन स्त्रिया, कांहीं शिष्य व चीनचा बादशहा यांसहवर्तमान बुद्धाविषयींचा आपला भक्तिभाव व्यक्त करण्यासाठीं चीनमधून निघून नेपाळांत आला. सरोवराच्या कांठीं येतांच त्याला असें आढळून आलें कीं सरोवराचा विस्तार मोठा असल्यामुळें बुद्धदर्शन होणें शक्य नाहीं. ह्मणून त्यानें आपल्या हातांतल्या तलवारीनें सरोवराच्या दक्षिणेकडील डोंगराचा कडा तोडून टाकला. पाण्याला वाट सांपडतांच सरोवरांतलें सगळें पाणी दक्षिणेकडे वाहून गेलें व सरोवर कोरडें पडलें. हाच हल्लींचा नेपाळ प्रांत होय. बाघमती नदीचा प्रवाह हल्लीं सुद्धां याच खिंडींतून वाहतो व अद्याप ही खिंड कोटबार [ तलवारीचा वार ] याच नांवानें प्रसिद्ध आहे.

वरील दंतकथा सकृद्दर्शनींच इतकी अशक्य आणि हास्यास्पद आहे कीं तिची खऱ्या इतिहासांत गणना करणें चुकीचें होईल. कारण बौद्ध धर्मांत प्रविष्ट होणाऱ्या देवतांत मंजुश्री ही अगदीं शेवटची देवता होय. या मंजुश्रीचा प्रथमोल्लेख अमितायससूत्र या नांवाच्या एका संस्कृत ग्रंथांत केलेला असून त्याचें चिनी भाषांतर इ. स. ३८४ ते ४१७ च्या दरम्यान करण्यांत आलें. दुसरें असें कीं, पांच ध्यानी बुद्धांचा निर्माता आदिबुद्ध होय, ही कल्पना दहाव्या शतकाच्या आरंभापर्यंत बौद्धधर्मास अज्ञात होती. आदिबुद्ध आणि मंजुश्री यांच्या कालांत ६०० वर्षांचें अंतर असल्यामुळें त्यांचा परस्परसंबंध दाखविणें हें अगदीं वेडेपणाचें होय.

उपरिनिर्दिष्ट दंतकथेइतक्याच अविश्वसनीय असणाऱ्या वंशावळींच्या आधारानें नेपाळच्या जुन्या इतिहासाची जुळवाजुळव करण्याचा प्रयत्नहि झालेला आहे. परंतु, काश्मीरमधील वंशावळीप्रमाणें या नेपाळांतील वंशावळी अर्वाचीन इतिहासाच्या बाबतींत जरी

कदाचित् प्रमाणभूत मानतां येण्यासारख्या असल्या तरी प्राचीन इतिहाससंबंधानें त्यांचा फारसा उपयोग होण्यासारखा नाहीं. डॉ. राइट् यांनीं अशा एका वंशावळीचा उपयोग केलेला आहे. “ नेपाळचा इतिहास ” या आपल्या प्रसिद्ध ग्रंथांत त्यांनीं या वंशावळीचें इंग्रजी भाषांतर दिलें आहे. नेपाळसंबंधानें लिहिणारे फ्रान्सिस हॅमिल्टन, कर्कपॅट्रिक प्रिन्सेप, हॉगसन, भगवान्लाल इंद्रजी वगैरे गृहस्थांनीं या वंशावळींतून पुष्कळ माहिती घेतली आहे. या वंशावळींतून नेपाळचा जो काय अल्पस्वल्प प्राचीन इतिहास सांपडतो तो संक्षेपतः येथें देत आहों:—

वंशावळींत अशी माहिती मिळते कीं, नेपाळचें राज्य ने या नांवाच्या ऋषीनें स्थापिलें. हा गोपाल घराण्याचा मूळ पुरुष होय. या घराण्यानें ५२१ वर्षें राज्य केलें. त्यानंतर १५३६ वर्षांनीं किरात घराण्यांतील पुरुषांची राजसत्ता नेपाळावर होती. कुरुक्षेत्रावर कौरवपांडवांचें जें मोठें युद्ध झालें त्यांत या किरात घराण्यांतला जितेदस्ती नामक राजा पांडवांच्या बाजूनें लढला होता व त्या युद्धांत तो शेवटीं मरण पावला.

ही दंतकथा खरी कीं खोटी हें निश्चित ठरविण्यास आपल्यापाशीं कोणताहि पुरावा नाहीं; परंतु एक गोष्ट शक्य दिसते ती ही कीं, सबंध नेपाळावर राज्य करणारा एखादा राजवंश त्या वेळीं नव्हता. गोपाळ आणि लुब्धक यांच्या कांहीं बलिष्ठ घराण्यांच्या ताब्यांत नेपाळचे कांहीं भाग होते व त्या भागांवर त्यांचा अंमल चालत असे. नेपाळच्या तराईंतील पडेरिया नामक ठिकाणीं ज्या लुंबिनी बागेंत गौतमबुद्धाचा जन्म झाला, तेथील अशोकाच्या शिलालेखावरून नेपाळच्या इतिहासांतील एका विशिष्ट कालावर कांहीं प्रकाश पडतो. या शिलालेखावरून असें सिद्ध होतें कीं, ख्रिस्ती शकापूर्वी पांचव्या शतकांत शाक्यवंशाचा नेपाळशीं संबंध आला होता. हे शाक्य राजे नेपाळच्या

दक्षिण भागांत राज्य करीत होते व गौतम बुद्धाचा बाप शुद्धोदन याच्या पश्चात् सात पिढ्यांपर्यंत या वंशांतील राजांनीं वरील भागांत राज्य केलें अशी माहिती वायुपुराण आणि ब्रह्मांडपुराण या ग्रंथांत सांपडते. ख्रिस्त-पूर्व तिसऱ्या शतकांत अशोक राजानें ललितपट्टण ( हल्लीं पाटण ) येथें एक स्तूप बांधला. या स्तूपाचे अवशेष प्रवासी लोकांस अद्याप दाखविण्यांत येतात. यावरून अशोकाच्या राज्यांत नेपाळचा समावेश झाला असावा हें संभवनीय दिसतें. अशोकाच्या कालापासून इसवी सनाच्या पहिल्या शतकापर्यंतचा नेपाळचा इतिहास बिलकुल उपलब्ध नाहीं. इसवी सनाच्या पहिल्या शतकांत नेपाळमध्यें जें राजघराणें अस्तित्वांत आलें, त्याच्या नांवाचा शोध पंडित भगवान्लाल इंद्रजी यांनीं मोठ्या मुष्कीलीनें लावला. या राजवंशाचें नांव ' लिच्छवि ' हें होय. पंडित भगवान्लाल यांच्या प्रयत्नानें जे २३ शिलालेख उपलब्ध झाले, त्यांपैकीं १५ शिलालेख या लिच्छवि राजांच्या वेळचे आहेत. यानंतर मि. वेन्डेल यानींही तीन प्राचीन शिलालेख छापून प्रसिद्ध केले.

पंडित भगवान्लाल इंद्रजी यांनीं संग्रहीत केलेल्या १५ शिलालेखांवरून नेपाळच्या पुरातन लिच्छवी राजपुरुषांसंबंधानें जो कालनिर्णय केला आहे तो येणेंप्रमाणें:--

१ जयदेव पहिला, सुमारें इ. स. १

२ जयदेव दुसरा, हा या लिच्छवि राजकुलांतील १२ वा पुरुष होय. याच्या पूर्वींच्या ११ पुरुषांचीं नांवें शिलालेखांत दिलेलीं नाहींत व दुसऱ्या जयदेवाचा कालही दिलेला नाहीं.

१३ वृषदेव, सुमारें इ. स. २६०.

१४ शंकरदेव ,, ,, २८५.

१५ धर्मदेव, [ याच्या स्त्रीचें नांव राजवती ] सुमारें इ. स. ३०५.

१६ मानदेव, संवत् ३८६–४१३, इ. स. ३२९–३५६.

१७ महीदेव, सुमारें इ. स. ३६०.

१८ वसंतदेव ऊर्फ वसंतसेन, सं. ४३५ इ. स. ३७८.

१९ उदयदेव, सुमारें इ. स. ४००.

२० पासून २७ पर्यंत आठ राजांचीं नांवें १५ व्या शिलालेखांत सोडून दिलेलीं आहेत.

२८ शिवदेव पहिला, सुमारें इ. स. ६१०.

२९ या राजाचें नांव शिलालेखांत दिलेलें नाहीं.

३० ध्रुवदेव, श्रीहर्षसंवत् ४८ व इ. स. ६५४–५५.

३१ याचें नांव शिलालेखांत नाहीं.

३२ विष्णुगुप्त.

३३ नरेंद्रदेव, सुमारें इ. स. ६९०.

३४ शिवदेव दुसरा, आदित्यसेनाची कन्या मैखरी व राजभोगवर्मा याची कन्या वत्सदेवी या दोन स्त्रियांशीं याचा विवाह झाला होता. श्रीहर्षसंवत् ११९–१४५, इ. स. ७२५–७५१.

३५ जयदव दुसरा [ परचक्रकाम ], भगदत्तवंशीय हर्षदेवाची कन्या राजमती हिच्याशीं याचा विवाह झाला होता. श्रीहर्षसंवत् १५३, इ. स. ७५९–६०.

गुप्त घराण्यांतील प्रसिद्ध राजा चंद्रगुप्त यानें कुमारदेवीनामक एका लिच्छवी राजकन्येशीं लग्न केलें होतें, व तिच्याच पोटीं दिग्विजयी समुद्रगुप्ताचा जन्म झाला. त्यानंतर होऊन गेलेले बहुतेक गुप्त राजे, या लिच्छवी घराण्याशीं झालेल्या आपल्या घराण्याच्या संबंधाविषयीं मोठा अभिमान बाळगीत असत व त्यांनीं कोरलेल्या ताम्रपटांत आणि शिलालेखांतहि या गोष्टीचा उल्लेख त्यांनीं केला आहे. या लिच्छवी राजवंशांतील पुरुषांनीं मानगृह येथें इ. स. ७६० पर्यंत

राज्य केलें. वृषदेव नामक एका लिच्छवी राजानें नेपाळांतील कैलास-कूटभुवन येथें राज्य करणाऱ्या ठाकुरी घराण्यांतल्या महासामंत अंशुवर्मानामक राजास आपली मुलगी दिली होती. हा अंशुवर्मा मोठा लढवय्या होता व आपल्या श्वशुर घराण्याशीं तो पूर्ण नेकीनें वागला. असें सांगतात कीं, वृषदेवाच्या कारकीर्दींत विक्रमादित्य हा नेपाळांत गेला व कुमारदेवीशीं लग्न करून, गुप्त शक त्यानें नेपाळांत सुरू केला. अलाहाबाद येथील स्तंभावर समुद्रगुप्तानें कोरविलेल्या शिलालेखांत आपण नेपाळ जिंकल्याचा उल्लेख त्यानें केला आहे. परंतु गुप्त राजवंशाचें हें सार्वभौमत्व लिच्छवी राजांनीं कधीं झुगारून दिलें याचा उल्लेख मात्र कोठेंच सांपडत नाहीं. संवत् ३८६ ते ४१३ पर्यंत राज्य करणाऱ्या दुसऱ्या मानदेवाच्या कारकीर्दींत जयवर्मन् या नांवाच्या एका मनुष्यानें पशुपतिनाथाच्या देवळांत एक शिवलिंग स्थापिलें व जयेश्वर असें त्याचें नांव ठेविलें. हल्लीं हें लिंग अस्तित्वांत नाहीं; परंतु मानदेवाच्या बापानें उभारलेला १४ फूट उंचीचा त्रिशूल मात्र अद्याप शिल्लक आहे. सातव्या शतकाच्या आरंभीं, प्रसिद्ध चिनी महंत युआन चवांग हा नेपाळांत आला होता. त्यानें नेपाळदेशाविषयीं जी माहिती लिहून ठेवली आहे ती येणेंप्रमाणें:—“ अनेक पर्वत व दऱ्या ओलांडल्यावर आह्मी नेपाळांत जाऊन पोंचलों. बुद्धावर विश्वास ठेवणारे [ बौद्ध ] आणि न ठेवणारे [ हिंदू ] हे येथें शेजारीशेजारीं राहतात. बौद्धांचे मठ आणि घरें हीं एकाच जागीं बांधलेलीं असून, हिनायन आणि महायन पंथाचे २००० बौद्ध महंत या देशात आहेत. देशाचा राजा क्षत्रिय असून तो लिच्छवी राजवंशांतला आहे. हा राजा चतुर, न्यायी आणि नीतिमान् असून बौद्ध धर्मावर त्याचा फार विश्वास आहे. ” हुयेनत्संग यानें ज्या राजाचा उल्लेख केला आहे तो नरेंद्रदेव होय. तो, त्याचा बाप, व त्याचा

नं. ........
ता. ........

मुलगा या तिघांचीहि बौद्ध धर्माविषयीं अनुकूल वृत्ति होती. ज्ञात असलेल्या माहितीवरून असें दिसतें कीं, दुसरा जयदेव हा लिच्छवी वंशांतला शेवटला राजा होय; व त्यानें इ. स. ७२३ पर्यंत राज्य केलें. जयदेवानंतरच्या २५० वर्षांचा नेपाळचा इतिहास पूर्ण अज्ञात आहे. या कालांतली एकच गोष्ट नमूद केलेली आढळते. ती ही कीं, राघव॰ देव या नांवाच्या एका पुरुषानें इ. स. ८७९ मध्यें नेपाळांत एक नवीन शक सुरू केला. हा शक अद्याप तेथें चालू आहे.

इ. स. १००० च्या पुढें देखील नेपाळचा सुसंगत इतिहास फारसा सांपडत नाहीं; नेपाळविषयक हस्तलिखित कागदपत्रांत काहीं राजांचीं नांवें मात्र आढळतात. परंतु या कागदपत्रांचा काल निश्चित नाहीं. निर्भयरुद्र [ इ. स. १००८ ], प्रद्युम्नकाम [ १०६५ ], शंकर-देव, वनदेव, सदाशिव, मानदेव, नरेंद्रदेव वगैरे नांवें वरील कागद-पत्रांत सांपडतात. तेराव्या शतकाच्या पहिल्या पंचविशींत ' मल्ल ' [ Mala ] या नांवाचें एक राजघराणें सत्ताधारी झालें, व इ. स. १२२९ पासून १४५७ पर्यंत या घराण्यानें संबंध नेपाळ देशावर राज्य केलें. यक्षमल्ल हा या घराण्यांतला शेवटचा राजा होय. या मल्ल राजांच्या राजवटींत घडलेली महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मिथि-लेचा राजा हरिसिंह याचें नेपाळांत झालेलें पलायन ही होय. दिल्लीचा बादशाह महमद तघलक यानें या हरिसिंहावर दोन वेळां हल्ला केला व त्याला नेपाळचा आश्रय घेण्यास भाग पाडलें. असें सांगतात कीं, हरिसिंहाची कुलदेवता तुळजादेवी हिनें त्याला अशी सल्ला दिली कीं, " मुसलमानांच्या संसर्गानें भ्रष्ट झालेल्या या भूमीचा तूं त्याग कर आणि नेपाळांत जाऊन तेथें स्वतंत्र राज्याची स्थापना कर. " त्या-प्रमाणें हरिसिंह नेपाळांत गेला व पहिल्या प्रथम, आपली कुलदेवता जी तुळजादेवी तिचें एक मंदिर त्यानें उभारलें. दरम्यान, या देवीचें

अलौकिक सामर्थ्य तिबेटी लोकांस कळतांच त्यांनीं तिची मूर्ति चोरून नेण्याचा प्रयत्न केला. परंतु हा प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. ते भाटगांव शहरानजीक येतांच, सबंध शहराभोंवतीं भयंकर अग्निवलय असल्याचें त्यांस आढळून आलें व त्यामुळें ते पळून गेले. वरील काळांतली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे, दिल्लीचा मूर्ख बादशहा महमद तघलक यानें चीन देश जिंकण्यासाठीं पाठविलेल्या फौजेनें नेपाळदेश ओलांडला ही होय. नेपाळच्या उत्तर हद्दीवर या फौजेची चिनी फौजेशीं गांठ पडली व त्यांची भयंकर लढाई जुंपून तींत मुसलमानी फौजेचा सपशेल पराभव झाला. नेपाळांतून जातांना आणि येतांना या फौजेनें नेपाळी लोकांस फार उपद्रव दिला.

हरिसिंह व त्याचा पुत्र शक्तिसिंह यांनीं अनुक्रमें २८ व २२ वर्षें राज्य केलें. त्यांपैकीं शक्तिसिंहाचा चीनच्या बादशहाशीं मित्रत्वाचा संबंध होता व बादशहाहि त्यास आपला मांडलिक समजत असे. पुढें शक्तिसिंहाचा पुत्र श्यामसिंह हा निपुत्रिक असल्यामुळें नेपाळचीं राज्यसूत्रें मल्लवंशांतलि एका राजपुरुषाच्या हातीं गेलीं. ने. सं. ५२८ मध्यें नेपाळांत मोठा धरणीकंप झाला, त्यामुळें तेथील जीं बरींच देवालयें जमीनदोस्त झालीं त्यांत प्रसिद्ध मत्स्येंद्रनाथाचेंही देवालय होतें.

हरिसिंहाच्या राजघराण्याचा अस्त झाल्यावर जयभद्र मल्ल हा पुरुष पहिल्यानें नेपाळच्या गादीवर आला. त्याच्या वंशांतील राजा अशोकमल्ल यानें पट्टणच्या ठाकुरी राजांचा पराभव करून त्यांचा सर्व मुलुख आपल्या राज्यास जोडला. विष्णुमती, वंगमती व रुद्रमती या नद्यांनीं परिवेष्टित असलेल्या प्रदेशांत यानें श्वेतकाली व रक्तकाली या देवतांचीं देवालयें बांधलीं व त्यास उत्तरकाशी अथवा काशीपूर असें नांव दिलें. पुढील काळांत हेंच पवित्र क्षेत्र समजलें जाऊन तेथें मोठी यात्रा जमूं लागली. जयभद्रमल्लाचा मुलगा जयस्थितिमल्ल यानें

नेपाळी कायद्यांत सुधारणा केली. अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या व निरनिराळ्या घराण्यांचा निरनिराळा सामाजिक दर्जा ठरवून दिला. जयस्थितिमल्लाचा पुत्र जययक्षमल्ल हा शंकराचार्यांचा अनुयायी होता. यानें दक्षिणेंतून भट्ट या नांवाचे कांहीं ब्राह्मण नेपाळांत नेले व पशुपतिनाथाची पूजाअर्चा त्यांजकडे सोंपविली. या राजानें आपल्या तीन मुलांस, खाटमांडू [ त्या वेळचें कांतिपुर ], भाटगांव आणि बनेपा हीं तीन संस्थानें दिलीं व आपल्या एकुलत्या एक मुलीस पाटण संस्थान दिलें. यक्षमल्लाच्या मरणानंतर लागलीच त्याच्या मुलांत कलह उत्पन्न झाला व भाटगांव येथें राज्य करणाऱ्या मुलानें बनेपा संस्थान काबीज केलें, व कांतिपूरच्या संस्थानिकानें पाटण संस्थान खालसा करून तें आपल्या राज्यास जोडिलें. भाटगांव आणि कांतिपूर येथील हीं राजघराणीं, गुरखे लोकांनीं नेपाळ काबीज केलें त्या वेळेपर्यंत अव्याहत चालू होतीं.

यक्षमल्लाचा मोठा मुलगा भाटगांव येथील गादीवर बसला होता. या घराण्यांत होऊन गेलेले राजे फारसे पराक्रमी किंवा प्रसिद्ध नव्हते. यांपैकीं भूपतींद्रमल्ल नामक एका राजानें भाटगांव येथें एक मोठा दरबार किंवा राजवाडा बांधला. त्याचा पुत्र रणजितमल्ल यानें ने. सं. ८५७ मध्यें अन्नपूर्णा देवीच्या मंदिरांत एक मोठी घंटा टांगली. याच्या कारकीर्दींत, भाटगांव आणि काटमांडू येथील राजांची लढाई नेहमीं सुरू असे; व ही संधि साधून गुरखे लोकांचा सरदार नरभूपाल यानें नेपाळदेश आक्रमण केला. परंतु, जेव्हां तो त्रिशूलगंगा नदी उतरून गेला, तेव्हां नयाकोट येथील संस्थानिकाशीं त्याची गांठ पडली व त्या संस्थानिकानें त्याचा हल्ला परतवून लाविला. पुढें कांहीं दिवसांनीं नरभूपालाचा मुलगा पृथ्वीनारायण हा भाटगांव येथें रणजितमल्लाकडे पाहुणा या नात्यानें कांहीं दिवस जाऊन राहिला होता.

रणजितमल्लाच्या मुलाची व त्याची मोठी मैत्री होती. रणजितमल्लाचा ह्या एकुलता एक मुलगा जेव्हां मृत्यु पावला, तेव्हां भाटगांव येथील हें सूर्यवंशी राजघराणें कायमचें नष्ट झालें.

---

# ३ नेपाळचा इतिहास–पुढें चालू.

## गुरखा घराणें

यक्षमल्लानें आपल्या चार मुलांस आपलें राज्य वांटून दिलें त्यानंतरच्या ३०० वर्षांत, खाटमांडू, पाटण आणि भाटगांव या तीन राजसत्तांचे निरनिराळे तीन इतिहास जरी अस्तित्वांत आले, तरी तेवढ्या कालांत नेपाळांत महत्त्वाची अशी एकही गोष्ट घडून आली नाहीं. पुढें मात्र एक महत्त्वाचा आणि क्रांतिकारक फेरफार घडून आला. गुरखे लोकांचा अत्यंत महत्त्वाकांक्षी राजा पृथ्वीनारायण यानें नेपाळदेश पादाक्रांत केला, आणि एके रात्रीं, काटमांडू शहरांतले लोक इंद्रयात्रेच्या सणाचे दिवशीं खाण्यापिण्यांत आणि मौज मारण्यांत गुंतले असतां, अकस्मात् छापा घालून तें शहर त्यानें काबिज केलें. शहरांतील लोक दारूच्या निशेनें इतके झिंगून गेलेले होते कीं, त्यांपैकीं एकानेंही पृथ्वीनारायणाच्या प्रतिकारार्थ आपला हात उगारला नाहीं. हळूहळू पृथ्वीनारायणानें वरील तीन संस्थानांतील मल्लराजांचा उच्छेद करून टाकला व सबंध देशाची राजसत्ता आपल्या हातीं घेतली. त्यानें स्वतःस राज्याभिषेक करून घेतला व नेपाळच्या सिंहासनावर गुरखा घराण्याची स्थापना केली. हेंच घराणें नेपाळांत अद्याप राज्य करीत आहे. या घराण्याच्या कारकीर्दीचा इतिहास असामान्य गोष्टींनीं आणि विचित्र कारस्थानांनीं भरलेला आहे. या

घराण्यातील राजाच्या, तिबेट व चीनचे बादशहा आणि इंग्रज याच्याशीं अनेक कटकटी झाल्या. इ. स. १७९० त सरहद्दीसंबंधाचा वाद उपस्थित होऊन, नेपाळी लोकांनीं तिबेट देशावर स्वारी केली व तिचें पर्यवसान चीनच्या बादशहाशीं नेपाळचें युद्ध जुंपण्यांत झालें. चीनच्या बादशहानें ७०००० सैन्य पाठविलें व या सैन्यानें नेपाळी लोकांचा पूर्ण मोड करून काटमांडूपर्यंत त्यांचा पाठलाग केला. अत्यंत अपमानकारक अशा अटी कबूल करून नेपाळी लोकांस आपला बचाव करावा लागला. त्यानंतर इ. स. १८५४ सालीं नेपाळ आणि तिबेट यांच्या दरम्यान पुनः बेबनाव उत्पन्न झाला. उभय पक्षांची लढाइ होऊन तींत तिबेटी लोक पराभव पावले व दर वर्षी १०००० रु. खंडणी देण्याचें कबूल करून नेपाळी लोकांबरोबर त्यांनीं तह केला. नेपाळचा एक प्रतिनिधि ल्हासा येथें राहूं देण्याचेंही त्यांनीं कबूल केलें. इंग्रजांबरोबर नेपाळी लोकांची जी लढाई झाली तिची हकीकत प्रसिद्धच आहे. या लढाईच्या अखेरीस, इ. स. १८१६ त नेपाळी लोकांस इंग्रजांबरोबर तहाचें बोलणें करावें लागलें व इंग्रजांच्या रेसिडेंटास काटमांडू येथें राहूं देण्याची अट त्यांना मान्य करावी लागली. इंग्रजांबरोबर झालेल्या या लढाईची जबाबदारी ज्या गीर्वाण युद्धविक्रम नामक पुरुषावर होती, तो पुढें लवकरच मरण पावला आणि राजेंद्र विक्रमशहा हा दुष्ट व भांडखोर राजा नेपाळच्या गादीवर बसला. हा राजा लहान होता त्या वेळीं सेनापति भीमसेन थाप्पा हा मुख्य प्रधानाचें काम पहात होता व त्याच्या वेळेपासून नेपाळच्या राजांचें महत्त्व कमी होऊन खरी राजसत्ता तेथील प्रधानांच्या हातीं जाण्यास सुरवात झाली. 'धन्याचें नांव गण्या व नोकराचें नांव रुद्राजीबुवा' असा प्रकार होतां होतां जंगबहादूर प्रधानाच्या कारकीर्दीत नेपाळचें राजघराणें पूर्ण निर्माल्यवत् होऊन सगळी सत्ता प्रधानाच्या हातीं गेली.

भीमसेन थाप्पा याच्या हातीं नेपाळचीं राज्यसूत्रें सुमारें वीस वर्षें होतीं. पुढें कांहीं कारस्थान होऊन त्याच्या हातची प्रधानकी गेली व त्यांतच त्याचा अंत झाला. त्याच्या जागीं त्याचा पुतण्या मातबरसिंग हा प्रधान झाला. त्याजवर राणीची मोठी कृपा होती. पुढें लवकरच, मातबरसिंगाचा पुतण्या व नेपाळांतील गुरखे लोकांच्या इतिहासांतील एक प्रसिद्ध पुरुष सर जंगबहादूर, हा केवळ आपल्या चातुर्याच्या आणि शौर्याच्या जोरावर पुढें सरला व त्यानें आपल्या चुलत्याचा खून करून व निःशस्त्र सरदार आणि इतर कर्ते पुरुष यांची भयंकर कत्तल उडवून नेपाळची राजसत्ता आपल्या हातीं घेतली. राजाच्या हातून अनेक मूर्खपणाच्या गोष्टी घडल्यामुळें व खुद्द सर जंगबहादूर याच्या खुनाचें कारस्थान त्यानें रचल्यामुळें जंगबहादुरानें त्याला पदच्युत करून त्याच्या राणीस हद्दपार केलें व त्याचा अज्ञान मुलगा सुरेंद्रविक्रमशहा यास गादीवर बसविलें. जंगबहादूर हा इंग्लंडांत जाणारा पहिला नेपाळी होय. त्यानें १८५७ सालच्या बंडांत इंग्रजांस मदत करून त्यांची मैत्री संपादन केली, व त्याच्या मोबदल्यांत इंग्रजांनीं तराईचा बराच मोठा भाग नेपाळ सरकारास परत दिला. जंगबहादूर हा १८७८ सालीं मरण पावला, व त्याची जागा रणदीपसिंग यास मिळाली. इ. स. १८८५ त रणदीपसिंग मारला गेला व बीर समशेर हा मुख्य प्रधान झाला. १९०१ सालीं बीर समशेर हा अकस्मात् मरण पावला, व हल्लींचे मुख्य प्रधान महाराज समशेर जंगबहादूर यांस त्याची जागा मिळाली. गेल्या युरोपीय महायुद्धांत नेपाळ सरकारानें इंग्रजांस चांगली मदत केली ह्मणून त्यांनीं नेपाळास पूर्ण स्वातंत्र्य दिलेलें असून, काटमांडू येथील आपला रेसिडेंट त्यांनीं काढून घेतला आहे; व त्याच्या जागीं एका वकिलाची नेमणूक केली आहे. जंगबहादूरच्या मरणानंतर १८८१ सालीं राजा सुरेंद्रविक्रमशहा हे मृत्यु पावले, व त्यांचे चिरंजीव राजा पृथ्वी-



नेवारी लोकांचा भोजनसमारंभ.



सिसागढीपुढील देखावा.

वीरविक्रम हे सिंहासनाधिष्ठित झाले. राजेंद्रविक्रम यास जंगबहादुर यांनीं पदच्युत केल्यापासून, नेपाळच्या राजांच्या हातीं राज्यकारभारांतुली कोणतीही सत्ता राहिली नाहीं. प्रधान करील ती पूर्वदिशा. तथापि, नेपाळच्या सिंहासनावरील राजपुरुषास व्यक्तिशः मोठा मान दिला जातो व नाणींही त्याच्याच नांवानें पाडलीं जातात. हल्लींच्या महाराजांस ' हिज् मॅजेस्टी ' ( His Majesty ) ही पूर्ण स्वातंत्र्यसूचक पदवी असून त्या पदवीस साजेल असा ३१ तोफांचा मान त्यांस दिला जातो.

---

## ४ नेपाळांतील धर्म.

नेपाळांतील बहुतेक लोक गुभजू आणि देवभजू या दोन वर्गांत विभागले गेले आहेत. शिवाय कांहीं मूळचे रहिवासीही ( Aboriginal tribes ) आहेत. गुभजू हे बौद्धधर्मीय असून ते आपल्या गुरूंना फार पूज्य मानितात. हिंदू धर्माचा ' तांत्रिक ' ह्मणून जो एक भाग आहे त्याचे आपण अनुयायी आहों असें हे लोक ह्मणतात. देवभजू हे सर्व हिंदू आहेत. नेवारी जातीचे बरेच लोक व सर्व गुरखे हिंदू आहेत. नेपाळांत व त्याच्या जवळच्या सिकीम आणि भुतान या संस्थानांत बौद्धधर्म अद्याप भरभराटींत आहे व त्यामुळें हॉग्सन् साहेबाच्या वेळेपासून प्राच्यविद्याविशारदांचें या देशाकडे फार लक्ष्य लागून राहिलें आहे. इ. स. ११९७ सालीं, परधर्मोच्छेदक मुसलमानांनीं जेव्हां बिहार आणि बंगाल प्रांतांतील तीन मुख्य बौद्ध विहार लुटून फस्त केले, व नालंदा, ओदांतपुरी आणि विक्रमशिला येथील बौद्ध मठपतींची कत्तल उडविली, तेव्हां उरलेले बौद्ध धर्मगुरु, आपल्या धर्मग्रंथांसह नेपाळांत पळून गेले व तेथील बौद्धधर्मीय

राजांच्या कृपाछत्राखालीं त्यांनीं पुष्कळ वर्षें सुखानें वास्तव्य केलें. नेपाळांत त्यांनीं पुष्कळ मठ बांधले व असंख्य देवांच्या मूर्ति स्थापन केल्या. एकट्या काटमांडू शहरांतील मठांचीच संख्या ३०० हून अधिक आहे. बौद्धधर्मीय लोकांचें बहुतेक वाङ्मय संस्कृतांत लिहिलेलें असून, त्यांत बौद्धधर्माच्या–विशेषतः उत्तर हिंदुस्थानांतून त्याचें उच्चाटन होण्यापूर्वीच्या इतिहासाची रचना करण्यास मुबलक साहित्य मिळण्यासारखें आहे. सर बीर समशेर आणि त्याच्यामागून प्रधान झालेला सर चंद्र समशेर जंग बहादूर यांच्या प्रयत्नानें हें महत्त्वाचें वाङ्मय एका मोठ्या ग्रंथसंग्रहालयांत सुरक्षित ठेवण्यांत आलें असून त्यांत सुमारें २०००० हस्तलिखितें आहेत. बौद्धधर्मविषयक अनेक महत्त्वाच्या ग्रंथांचा त्यांत समावेश झाला आहे. शिवाय कांहीं वर्षांपूर्वीं नेपाळांतील अनेक हस्तलिखित ग्रंथ पारीस, लंडन, केंब्रिज, कलकत्ता आणि मुंबई या ठिकाणीं नेण्यांत आलेले असून ते चांगल्या सुरक्षित स्थितींत ठेवण्यांत आलेले आहेत.

बौद्धधर्मीय लोक असें मानतात कीं, आदिबुद्ध आणि त्याची शक्ति प्रज्ञापरमिता यांनीं या विश्वाची उत्पत्ति केली आहे. या आदिबुद्धापासून अमिताभ, वैरोचन, अमोघसिद्धि, अक्षोभ्य आणि रत्नसंभव हे पांच ध्यानी बुद्ध उत्पन्न झाले; व पंडारा, लोकना, तारा, मामक आणि आर्यतारा या त्यांच्या पांच शक्ति होत. या पांच जोडप्यांपासून आणखी पद्मपाणी, रत्नपाणी, विश्वपाणी, वज्रपाणी आणि समंतभद्र हे सहा बोधिसत्व उत्पन्न झाले. या बोधिसत्वांच्या द्वारें उपरिनिर्दिष्ट ध्यानी बुद्ध हे आपलें उत्पत्तिकार्य करीत असतात. या प्रत्येकाचा काल ३२००० वर्षांचा असून तेवढ्या कालांत आठ मर्त्य [ Mortal ] बुद्ध या भूतलावर अवतीर्ण होतात. या ३२००० वर्षांच्या कालास कल्प असें ह्मणतात. चालू कल्पाचें नांव भद्रकल्प असें असून त्याची अधिष्ठात्री देवता अवलोकितेश्वर आहे. हा अवलोकितेश्वर, अमिताभ

आणि त्याची शक्ति पंडारा यांचा धर्मपुत्र होय. याच्या कारकीर्दीत गौतमबुद्धासह सात बुद्ध होऊन गेले व आठवा मर्त्य बुद्ध मैत्रेय हा गौतमबुद्धाच्या मृत्यूस ४००० वर्षें झालीं ह्मणजे अवतीर्ण व्हावयाचा आहे. करंडव्यूह ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, हा अवलोकितेश्वर सर्व बोधिसत्वांत अत्यंत उदार असून, त्याला मुक्तीचा पूर्ण अधिकार असतांही, विश्वांतील इतर सर्व प्राण्यांची माराच्या पाशांतून मुक्तता होईपर्यंत, स्वतः मुक्तिग्रहण करावयाचें नाहीं असें त्यानें ठरविलें आहे. करंडव्यूह ग्रंथांतील एका परिच्छेदांत असें सांगितलें आहे कीं, अवलोकितेश्वर हा जगांत अद्याप धर्मप्रसार करीत आहे. जे लोक विष्णूची भक्ति करितात त्यांना तो विष्णुरूपानें धर्म शिकवितो; गणेशभक्तांना तो गणेशरूपानें धर्म पढवितो व प्रसंगविशेषीं आपल्या भक्तांना धर्मशिक्षण देण्यासाठीं तो मातृपितृरूपानेंही अवतरतो.

पांच ध्यानी बुद्धांपासून असंख्य देव आणि देवी यांची उत्पत्ति झालेली असून, त्यांच्या मूर्तींच्या मस्तकावर त्यांच्या धर्मपित्याची सूक्ष्म प्रतिमा कोरलेली असते.

नेपाळांतील बौद्ध लोक जो धर्म पाळतात तो तांत्रिक बौद्धधर्म होय. वज्रायण, सहजायन आणि कालचक्रायण असे त्याचे तीन मुख्य विभाग आहेत. निर्वाण मिळविणें किंवा सिद्धि संपादन करणें हें या धर्मविभागांचें उद्दिष्ट होय. या तीन 'अयना' चे निरनिराळे अनेक धर्मविधि असून त्यांतले कांहीं विधि इतके बीभत्स आहेत कीं त्यांचें वर्णन करणें शक्य नाहीं.

# ५ नेपाळांतील हिंदू लोक.

नेपाळातील हिंदू देवतांच्या मंदिरांतील संपत्ति, आणि देव व देवी याविषयींची हिंदू लोकांची भक्ति यांच्या योगानें, पुरोहित ऊर्फ उपाध्ये लोकांचा नेपाळांत अगदीं सुळसुळाट झाला आहे. शिवाय यजमानास-ही त्यांची नेहमी गरज लागते. यजमानाकडून मिळणारी दक्षिणा व यात्रेकरू लोकांकडून देवाल्यांत मिळणारा पैसा, यांजवर या पुरोहितांचा व गुरूंचा निर्वाह चालतो. या सर्व पुरोहितांत राजगुरु [ राजघराण्याचा पुरोहित ] हा श्रेष्ठ असून सामाजिक आणि धार्मिक बाबतींत तो करील ती पूर्वदिशा असा प्रकार आहे. हिंदुस्थानच्या इतर भागातील लोकांपेक्षां नेपाळी लोक स्वभावतःच अधिक धर्मवेडे आहेत व त्यामुळें तेथील ज्योतिषांचें चांगलें फावतें. जोश्याला विचारल्याशिवाय तेथील लोक कोणतेंही महत्त्वाचें कार्य करावयाचे नाहींत, मग तें कार्य औषध घेण्याचें असो कीं लढाईवर सैन्य पाठविण्याचें असो. ब्राह्मणांच्या खालोखाल वैद्य जातीचें महत्त्व हिंदू लोकांत विशेष आहे. घराणें गरीब असो वा श्रीमंत असो, प्रत्येक घराण्याच्या आश्रयास वैद्य हा असावयाचाच. या दोन जातींशिवाय कारकून किंवा नकलनवीस ही एक स्वतंत्र जात अलीकडे मानण्यांत आली आहे. धंद्यावरूनही अनेक जाती झालेल्या आहेत, पण त्यांचा अंतर्भाव हिंदूंत करावयाचा कीं बौद्धांत करावयाचा हें ठरविणें कठीण आहे. चुनार ( सुतार ), सारकी ( चांभार ), कामी ( लोहार ), सुनार ( सोनार ), गैन ( गवई ), दमाई ( शिंपी ), कुम्हाल ( कुंभार ), ने ( खाटीक ) इत्यादि अनेक जाती नेपाळांत आहेत. यांशिवाय मूळचे रहिवासी आहेत ते निराळेच. त्यांच्या चालीरीति आणि आचारविचार अगदीं चमत्कारिक आहेत. या लोकांपकीं मगार, गुरंग वगैरे जातींच्या लोकांचा नेपाळी फौजेंत मोठा भरणा आहे.

(stamp)

## ६ भाषा.

नेपाळांतील लोकांची मातृभाषा पर्वतीय या नांवाची आहे. सरकार-दरबारीं हीच भाषा चालते. नेपाळांतील मूळचे रहिवासी नेवारी भाषा बोलतात. या भाषेचें तिबेटी भाषेशीं बरेंच साम्य आहे; व त्यावरून शोधकांनीं असा तर्क केला आहे कीं, नेवारी जातीचे लोक हे मंगोलियन वंशांतील असावेत. वरील दोन भाषांशिवाय, नेपाळांत आणखी अनेक भाषा प्रचलित आहेत त्या येणेंप्रमाणें:—तिबेटी, सेर्पा, भुतानी, लेप्चा, लिंबू, किराती, मुरमी, गुरुंग, मगार, सुनवार, थोचू, सोपका, स्याही, स्यारंग, होर्पा, टाक्पा, मन्याक वगैरे. या अनेक भाषांची भिन्नता पाहण्यासाठीं आपण 'बाप' हा शब्द उदाहरणार्थ घेऊं. लिहिण्याच्या तिबेटी भाषेंत 'बाप' याला 'फा' हा शब्द असून, बोलण्याच्या तिबेटी भाषेंत 'पाला' शब्द आहे. सेर्पा भाषेंत 'आबा'; भुतानी भाषेंत 'अप्पा'; लेप्चा भाषेंत 'आब्प'; लिम्बा भाषेंत 'आम्बा'; किराती भाषेंत 'ओपा'; मुर्मी भाषेंत 'आपा'; नेवारी भाषेंत 'आबू'; गुरुंग भाषेंत 'आबो'; मगार भाषेंत 'बाई'; सुनवार भाषेंत 'बेव्ह'; थोचू भाषेंत 'ऐ'; सोप्का भाषेंत 'इचिकी'; स्यामी भाषेंत 'धादा'; स्यारंग भाषेंत 'टेप'; होर्पा, टाक्पा आणि मन्याक या भाषांत 'आपा' असे 'बाप' वाचक शद्ब आहेत. या वरील भाषा नेपाळांतील मुख्य भाषा आहेत व भाषादृष्टीनें लोकसंख्येचे तितके विभाग झालेले आहेत.

# ७ खाद्यपेय.

नेपाळांतील निरनिराळ्या जातींच्या व धर्मांच्या लोकांत जरी पुष्कळच भिन्नता आहे, तरी त्यांच्या खाद्यपेयांत म्हणण्यासारखा फरक दिसत नाहीं. नेपाळांतील बहुतेक लोक अट्टल मांसाहारी आहेत. गुरखे लोक सामान्यतः बोकडाचें मांस खातात. ते शिकारीचे मोठे शौकी असून शिकारींत मारलेल्या निरनिराळ्या जातींच्या सावजांचें व पक्ष्यांचें मांस ते खातात. बहुतेक लोक डुकरें पाळतात व नेवारी लोकांस डुकराचें मांस फार आवडतें. रेडे, बकरे, बदकें, कोंबडी वगैरे प्राण्यांचें मांस बहुतेक नेपाळी लोक मोठ्या आवडीनें खातात. मगार आणि गुरंग या जातीचे लोक जरी आपणास हिंदू म्हणवितात तरी त्यांचें मुख्य भक्ष्य अनुक्रमें डुकराचें आणि रेड्याचें मांस हेंच आहे! परंतु त्यांतही आणखी गंमत आहे ती ही कीं, मगार जातीचे लोक डुकराच्या मांसावर वाटेल तसा ताव मारतील, परंतु महिषमांसाकडे ढुंकूनही पाहणार नाहींत! उलट पक्षीं गुरंग जातीचे लोक महिषमांसाचे मोठे भोक्ते आहेत, पण ते वराहमांसाला नुसता स्पर्शही करणार नाहींत! हे लोक मांसाची कढी अर्ध्यातासापेक्षां अधिक वेळ शिजवीत नाहींत, त्यामुळें आंतील मांस बहुतेक कच्चेंच रहातें. मांस तळूनही खातात. गरीब लोक बहुतेक वनस्पत्याहारी आहेत. कारण त्यांजपाशीं मांस विकत घेण्याइतका पैसा नाहीं. मांसाहारी लोक जीं अनेक किळसवाणीं पक्वान्नें तयार करितात त्यांत 'सिंकी' या नांवाची एक चटणी असते. ती कुजलेल्या गाजरापासून तयार केली जाते ही चटणी मोठी पाचक आहे असें ते लोक समजतात, पण वस्तुतः ती अत्यंत किळसवाणी आणि कमालीची घाणेरडी असते. नेवारी लोक अट्टल दारूबाज आहेत. ते आपल्या घरींच एक प्रकारची देशी

तयार करितात ती सर्व नेपाळभर 'रुक्सी' या नांवानें प्रसिद्ध आहे. ही रुक्सी वाटेल त्याला आपल्या घरीं तयार करतां येते व तिजवर कर घेतला जात नाहीं. परंतु हीच दारू जर कोणास बाजारांत विकावयास आणावयाची असेल तर त्याला सरकारचा परवाना काढावा लागतो. नेवारी लोक–विशेषतःत्यांचे पुरोहित–अतिशय दारू पितात, पण त्यांना कधीं निशा येत नाहीं. सणावाराचे दिवशीं तर हे लोक अमर्याद दारू पितात. उच्च व सन्मान्य घराण्यांतील लोक दारूस नुसता स्पर्शही करीत नाहींत व त्यांपैकीं एखाद्यानें जर कधीं काळीं मद्यपान केलेंच तर त्याला जातिबाहिष्कृत व्हावें लागतें.

ज्याच्यापाशीं चहापुरतेही पैसे नाहींत तेवढे लोक शिवायकरून नेपाळांतील इतर सर्व लोक चहा पितात. हा चहा तिबेटांतून येतो व त्यांत नानाप्रकारचे मसाले घालून तो शिजवितात. दारू, साखर आणि लिंबाचा रस, यांच्या मिश्रणासारखी या चहाची चव लागते. चहा करण्याचा दुसरा एक प्रकार आहे, त्यांत साखर आणि तूप यांचा उपयोग करितात. शिवाय चहाचें एक पक्वान्नही ते तयार करितात. चहाचीं हिरवीं पानें, चरबी व तांदळांचा कोंडा हीं पाण्यांत कालवून उन्हांत वाळत ठेवतात व तें मिश्रण चांगलें दरदरून आलें म्हणजे मग तें एका लांबट आकाराच्या भांड्यांत ठेवितात. हें मिश्रण केव्हा केव्हां दुधाबरोबर घेतात. चहा तयार करण्याचा हा प्रकार चीन देशांतही आहे व त्याला तिकडे तुंग्काव असें म्हणतात. पाश्चात्य पद्धतीनें तयार केलेला चहा या लोकांस आवडत नाहीं. जे श्रीमंत नेपाळी लोक पाटणा व कलकत्ता यांसारख्या मोठ्या शहरांत राहून परत नेपाळांत गेलेले आहेत ते मात्र पाश्चात्य पद्धतीनें तयार केलेला चहा पितात.

# ८ सण आणि उत्सव.

देव आणि ब्राह्मण यांजवर नेपाळी लोकांची फार भक्ति असल्या-मुळें असंख्य क्षेत्रें आणि देवालयें यांची तेथें एकच गर्दी झालेली आहे. या क्षेत्रांची आणि देवालयांची एकंदर संख्या २७३३ आहे, व प्रत्येक देवळांतील देवाचा किंवा क्षेत्रस्थानाचा दरवर्षी एक तरी उत्सव होत असतो. नेपाळांत सबंध वर्षभर नानाप्रकारचे उत्सव सारखे चालू असतात. प्रत्येक दिवशीं एकदोन उत्सव हे असावयाचेच. नेवारी लोकांचे वर्षांतील सहा महिने उत्सव साजरे करण्यांत जातात. प्रत्येक सणाची आणि उत्सवाची ठरावीक परंपरा आणि पद्धत असते. या उत्सवांच्या स्वरूपाची नुसती रूपरेखा सांगण्यासही मला आतां वेळ नाहीं, परंतु कांहीं मुख्य उत्सवांचें येथें नुसतें दिग्दर्शन करितों.

नेपाळांतील महत्त्वाचा उत्सव म्हटला म्हणजे मत्स्येंद्रनाथ याचा होय. मत्स्येंद्रनाथ हा नेपाळची राष्ट्रदेवता असून भोगमती नामक गांवांत त्याची मूर्ति आहे. वैशाख शुद्ध प्रतिपदेस ही मूर्ति नग्नावस्थेंत एका कांबळींत गुंडाळतात व रथावरून तिची मिरवणूक काढतात. पाटण शहरांतून ही मिरवणूक जाऊं लागली म्हणजे ठिकठिकाणीं ही मूर्ति कांबळींतून बाहेर काढून लोकांस दाखवितात. एक महिन्यानंतर ही मूर्ति पूर्वस्थलीं नेण्यांत येते.

२ वज्रयोगिनी यात्रा. काटमांडू शहरापासून १५ मैलांवर संकू या नांवाचें ठिकाण आहे व त्याच्या पलीकडे मणिचूड पहाडावर वज्र-योगिनीचें मंदिर आहे. देवीची मूर्ति एका खाटेवर ठेवतात व वैशाख शुद्ध तृतीयेच्या दिवशीं व त्यानंतर आणखी कांहीं दिवस संकू गांवांतून तिची मिरवणूक काढतात. असें म्हणतात कीं, या देवीचें देवालय पूर्वीं

पूर्वबंगालमधील विक्रमपूर परगण्यांतल्या वज्रयोगिनी गांवीं होतें, व सुमारें ६०० वर्षांपूर्वीं ही मूर्ति नेपाळांत आणण्यांत आली.

३ सिथी यात्रा.–काटमांडू आणि सिनूभू यांच्या दरम्यान, विष्णुमती नदीच्या कांठीं ज्येष्ठ वद्य ६ रोजीं ही यात्रा भरते. जेवणानंतर लगलीच लोक तेथें जमा होतात व दोन मेळ करून दोन बाजूला उभे राहतात. नंतर दगडफेंक करून एकमेकांवर ते हल्ला करितात. त्यामुळें बहुतेक लोक जखमी होतात. मारामुळें एखादा मनुष्य जर बेशुद्ध झालेला आढळला, तर त्याला जवळच्या कनकेश्वरीच्या देवळांत नेऊन वळी देत असत, परंतु कुऱ्याच वर्षांपासून सरकारानें ही क्रूर चाल कायद्यानें बंद केली आहे.

४ बोन्राह यात्रा.–बोन्राह याचे वाडवडील भिक्षू होते व ते आपला उदरनिर्वाह भिक्षेवर चालवीत असत. या बोन्राहांच्या सन्मानार्थ हा उत्सव करण्यांत येतो. श्रावण शुद्ध ८ व भाद्रपद शुद्ध १२ रोजीं बोन्राह पुरोहित यजमानांचे घरीं भिक्षेस येतात व त्या वेळीं द्रव्य व धान्य या रूपानें त्यांना जी भिक्षा मिळते तिच्यावर वर्षभर त्यांचा निर्वाह चालतो. या प्रसंगीं राजास आपल्या घरीं बोलवावें असें जर एखाद्या नेवारी गृहस्थाच्या मनांत आलें तर त्याला राजास एक चांदीचें सिंहासन व एक शाल द्यावी लागते.

५ नागपंचमी.–श्रावण शुद्ध ५ रोजीं, नाग आणि गरुड यांच्या युद्धाचें स्मारक ह्मणून हा सण साजरा केला जातो. असें सांगतात कीं, या दिवशीं चांगू नारायणाच्या देवळांतील गरुडमूर्तीस युद्धाच्या श्रमामुळें घाम येतो व तेथील पुजारी एका फडक्यानें हा घाम सारखा पुशीत असतो. या फडक्याचा तंतु जवळ बाळगणारास सर्पाचें किंवा सर्पदंशाचें भय नाहीं अशी तिकडील लोकांची समजूत आहे.

६ पिशाचनृत्य.—भाद्रपद अमावास्येच्या दिवशीं सगळीं माणसें गाईचे मुखवटे घालतात व राजवाड्यासभोंवतीं फिरतात. त्याच महि-न्याच्या शुद्ध ३ रोजीं हीं माणसें वाघाचे मुखवटे घालतात व नृत्य आणि गायन करून स्वतःची करमणूक करितात.

७ इंद्रयात्रा.—भाद्रपद वद्य ११ रोजीं ही यात्रा सुरू होते व पुढें आठ दिवस चालू राहते. पहिल्या दिवशीं राजवाड्यासमोर एक उंच ध्वज उभारण्यांत येतो व राजाश्रित नृत्यांगनांचा राजमहालासभोंवतीं नाच होतो. तिसऱ्या दिवशीं पुष्कळ कुमारिकांस राजवाड्यांत आण-वून राजा त्यांचें पूजन करतो, व लागलीच रथावर आरूढ होऊन कुमारिकांसह नगराच्या मध्यभागांतून मिरवत जातो. ही मिरवणूक पुनः राजवाड्यांत आली ह्मणजे राजा एका गादीवर विराजमान होतो व राजा हजर नसल्यास त्याची तलवार गादीवर ठेवण्यांत येते. मग राज्यांतील सरदार लोक व इतर कामदार राजास अनेक प्रका-रच्या भेटी नजर करितात. हा सर्व प्रकार अनंतचतुर्दशीच्या दिवशीं होतो. गुरखे लोकांचा राजा पृथ्वीनारायण यानें काटमांडू शहरांत याच दिवशीं प्रवेश केला होता. इंद्रयात्रेच्या उत्सवांत शहरांतील सर्व नेवारी लोक उत्सवमग्न व मदिरावश असतां पृथ्वीनारायणानें अक-स्मात् छापा घालून नेपाळची गादी बळकावली. आपले लोक मदिरा-पानानें धुंद झालेले पाहून, नेपाळचा नेवारी राजा, पृथ्वीनारायणाशीं लढाई करण्याच्या भानगडींत न पडतां पळून गेला. नेपाळी लोकांची अशी समजूत आहे कीं, या दिवशीं जर भूकंप झाला तर राज्यावर एखादें संकट खात्रीनें येणार ! व याप्रमाणें जर खरोखरच भूकंप झाला तर नेवारी लोक त्या दिवसापासून पुढें आणखी आठ दिवस हा उत्सव साजरा करितात !!

८ दिवाळी.—कार्तिक मासीं लक्ष्मीपूजन झाल्यावर सारी रात्र नेपाळी लोक जुगार खेळतात. वास्तविक पाहातां जुगार खेळणें कायद्यानें बंद

केलेलें आहे; परंतु या उत्सवांतील तीन दिवस जुगार खेळण्यास सर्वांस मोकळीक आहे. ह्या तीन दिवसांत जुगारी लोकांच्या रहदारी-मुळें रस्त्यांत फार गर्दी होते. कित्येक लोक जवळचा सर्व पैसा हरवून बसल्यावर दागिने, धोतरें, पैरणी वगैरे वस्तूंदेखील जुगारांत घालतात व शेवटीं आपल्या स्त्रियांसही जुगारांत लावण्यास कमी करीत नाहींत ! क्वचित् प्रसंगीं एखादा अट्टल जुगारी आपला एक हात* छाटून तो जुगारांत घालतो व त्या डावांत त्यास जय मिळाल्यास, आपल्या प्रतिस्पर्ध्यानें आपला हात तोडून द्यावा किंवा त्यानें मिळविलेली सर्व रकम आपणास द्यावी अशी मागणी करितो ! जुगाराचे इतके शौकी दुनियेंत दुसरीकडे क्वचितच आढळतील.

९ किचा पूजा.—हा नेवारी लोकांचा सण असून तो कार्तिक मासीं साजरा करण्यांत येतो. कार्तिक वद्य १ रोजीं सर्व नेवारी लोक कुत्र्यांची पूजा करितात व त्यांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालितात ! याचप्रमाणें रेडा, कावळा व बोकड यांच्याही पूजनाचे कांहीं नियमित दिवस आहेत.

१० वालाचतुर्दशी.—( आश्विन शुद्ध १४ ) या दिवशीं सर्व नेपाळी लोक पशुपतिनाथमंदिराजवळच्या मृगस्थली नामक अरण्यांत जाऊन तेथील वानर व माकडें यांस तांदूळ व फळफळावळ फेंकतात.

११ नेपाळांतील सर्व उत्सवांत रथयात्रेचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होतो. ही यात्रा इ. स. १७४० व १७५० यांमधील एका वर्षी राजा जयप्रकाशमल्ल याच्या कारकीर्दीत पहिल्यानें सुरू झाली. त्या वेळीं एका सात वर्षांच्या बांडा कुमारिकेच्या अंगांत येऊन तिनें असें सांगितलें कीं, आपण आदिशक्तीचा अंशावतार आहोंत. ही गोष्ट

* असा प्रकार नेपाळांत फक्त एकच वेळ घडला आहे.

जेव्हां परंपरेनें राजाच्या कानावर गेली, तेव्हां तिच्या बोलण्याचा उपहास करून त्यानें तिला नगराबाहेर हांकून लाविलें व तिच्यापाशीं जें काय होतें नव्हतें तें सर्व जप्त केलें. नंतर रात्रौ राणीला अकस्मात् वायु झाला व ती मोठ्यानें ओरडूं लागली कीं, आपल्या छातीवर देवी बसली आहे! आपल्या राणीची एकाएकीं अशी भयंकर अवस्था झालेली पाहून व तिचें विचित्र भाषण ऐकून राजास मोठें आश्चर्य वाटलें. नंतर त्यानें त्या बांडाकन्येस मोठ्या समारंभानें राजवाड्यांत आणिलें व सर्वांसमक्ष तिचें देवत्व मान्य करून तिचा क्रोध शांत केला. इतकेंच नव्हे तर तिला मोठया उत्पन्नाची जमीन इनाम करून देऊन तिची मोठी बडदास्त ठेविली. पुढें या मुलीस प्रतिवर्षी रथांत बसवून तिची मिरवणूक काढण्यांत येऊं लागली व त्या दिवसापासून ही रथयात्रा नेपाळांत सुरू झाली. ज्याप्रमाणें, ओढ्या जगन्नाथाच्या रथोत्सवांत, जगन्नाथ व बलराम यांच्यामध्यें सुभद्रेची मूर्ति ठेवतात, त्याप्रमाणें या बांडा कन्येच्या दोहों बाजूंस दोन बांडा कुमार बसविण्याचा प्रघात होता. पुढें कांहीं वर्षांनीं ती कन्या मरण पावली, तथापि तिच्या मूर्तीचा उत्सव करण्याची चाल नेपाळी लोकांत अद्याप सुरू आहे.

१२ दुर्गापूजा.–दुर्गापूजेच्या वेळीं कोट येथील इतिहासप्रसिद्ध तटाच्या आंत एक विलक्षण विधि केला जातो. निरनिराळ्या पक्षांकडून होणाऱ्या कारस्थानामुळें गुरखे लोकांचें सामर्थ्य कमी होऊं लागलें त्या वेळीं इ. स. १८४६ सालीं, जंगबहादूर यानीं याच ठिकाणीं अनेक खून आणि कत्तली करून भयंकर रक्तपात केला. तशाच प्रकारचा रक्तपात त्याच ठिकाणीं व त्याच दिवशीं अद्याप होत असतो, परंतु तो मनुष्यांचा नसून निरुपद्रवी आणि निरपराधी जनावरांचा असतो, इतकाच काय तो फरक. दुर्गापूजेच्या ९ व्या दिवशीं लढाऊ शस्त्रांची व राष्ट्रीय ध्वजाची पूजा करण्याचा नेपाळी लोकांचा प्रघात आहे; व या पूजेच्या

वेळीं हजारों प्रचंड रेडे देवीस बळी देण्यात येतात ! फौजेंतील प्रत्येक पलटणीवरील अधिकाऱ्यानें एकेक रेडा दिलाच पाहिजे. बळी दिलेल्या रेड्याचें रक्त एका मोठ्या पितळेच्या भांड्यांत ठेवतात व फौजेवरील मुख्याधिकारी—सेनापति—आपले दोन्ही हात त्या रक्तांत भिजवितो व ध्वजाचा एक तंतु हातांत घेऊन दोन्ही हातांनीं चोळतो. जितके ध्वज किंवा शस्त्रें पुढें करण्यांत येतील तितके वेळां या प्रकाराची पुनरावृत्ति करण्यांत येते. हा अंगावर शहारे आणणारा देखावा ज्यांनीं पाहिला आहे ते म्हणतात कीं, तो देखावा कमालीचा रोमहर्षण असून नाटकांतल्या एखाद्या भीषण देखाव्यासारखा तो दिसतो !

वर ज्या सणांचें व उत्सवांचें वर्णन केलें त्यांतील मुख्य धर्मविधींच्या जागीं फारच थोडे लोक हजर असतात. इतर सर्व लोक मौज मारण्यांत, बेसुमार मद्यपान करण्यांत आणि निरनिराळ्या खाद्यपदार्थांवर ताव मारण्यांत दंग झालेले असतात. त्यांचा मुख्य खाद्यपदार्थ म्हटला म्हणजे मांस हा होय.

---

## ९ विवाहपद्धति.

गुरखे लोकांत, पुष्कळ बायका करणें हें मोठ्या श्रीमंतीचें आणि चैनीचें लक्षण समजतात व अनेक स्त्रियांशीं लग्न करणाऱ्या मनुष्याला ते लोक मोठा मान देतात. नेपाळांत बहुपत्निकत्वाची चाल असूनही तेथें एकही विधवाविवाह आजपर्यंत घडून आलेला नाहीं हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. जंगबहादूरच्या काळीं सती जाण्याची चाल नेपाळांत अगदीं जारीनें सुरू होती. पूर्वकालीं या देशांतील अनेक पतिव्रता स्त्रिया आपल्या पतीच्या शवाबरोबर सहगमन करीत असत व अशा स्त्रियांचा स्वार्थत्याग, कठोरहृदयी नेपाळी लोकांच्या अंतःकर-

णांत चांगलाच धर्मप्रकाश पाडीत असे. परंतु हल्लीं ही सती जाण्याची चाल, हिंदुस्थानांतील इतर भागांप्रमाणें नेपाळांतही नामशेष होऊन राहिली आहे.

बहुपत्निकत्वाची चाल गुरखे लोकांत पूर्वीं इतकी सामान्य नव्हती. परंतु ती पुढील कारणामुळें रूढ झाली. नेपाळचे पूर्वींचे राजपुरुष केवळ स्वच्छंदानुवर्ती असल्यामुळें राज्यांत सर्वत्र बेबंदशाही माजून राहिली होती व राजकुलोत्पन्न पुरुषांच्या आपसांतील बेबनावास प्रजेस आपल्या स्वास्थ्याचा बळी प्रत्यहीं द्यावा लागत असे. पुढें, नेपाळचे माजी मुख्य प्रधान जंगबहादूर यांनीं नेपाळच्या राजास पदच्युत करून सर्व राजसत्ता आपल्या हातीं घेतल्यापासून नेपाळांत सर्वत्र स्वस्थता झाली. नेपाळचा राज्याधिकार आपण बळकावल्यामुळें देशांतील पुष्कळ मोठे लोक आपले शत्रु झालेले आहेत असें जेव्हां जंगबहादूर यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां त्यानीं मोठ्या दूरदर्शीपणानें नेपाळांतील मोठमोठ्या खानदानीच्या कुलीन घराण्याशीं आपला शरीरसंबंध जोडला व आपल्याशीं शत्रुत्वानें वागणाऱ्या सरदार लोकांच्या मुलींचे आपल्या पुत्रपौत्रांशीं विवाह करून टाकले. पुढें त्यांचें अनुकरण इतर गुरखे लोकांनीं केलें व त्यामुळें ही बहुपत्निकत्वाची चाल मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. इ. स. १८५१ त जंगबहादूर विलायतेस गेले व तेथें एक वर्ष राहून इंग्रज लोकांच्या चालीरीतींचें व राज्यव्यवस्थेचें त्यांनीं सुक्ष्मदृष्टीनें अवलोकन केलें. पुढें ता. ८ फेब्रुवारी सन १८५२ रोजीं ते नेपाळांत परत आले व पहिल्यानें त्यानीं नेपाळांतले जुने फौजदारी कायदे रद्द करून प्रजाजनांस सुखावह होतील असे नवे कायदे केले. सती जाण्याच्या चालीस प्रतिबंध करण्याकरितांही त्यानीं कांहीं नवे कायदे केले. ते येणेंप्रमाणें:–( १ ) ज्या स्त्रीस मुलगा झालेला असेल तिला सती जातां येणार नाहीं, मग तसें करण्याची

तिची इच्छा असो वा नसो. (२) श्मशानांत गेल्यावर जी स्त्री आपल्या मृत पतीच्या चितेस पाहून भिईल व अग्निप्रवेश करतांना कंपित होईल तिला सती जाऊं दिलें जाणार नाहीं. हे नवे नियम होण्यापूर्वी या बाबतींत तिकडे अशी भयंकर चाल होती कीं, जर एखाद्या स्त्रीनें सती जाण्याची आपली इच्छा एकदां व्यक्त केली व पुढें श्मशानांत गेल्यावर तेथील प्रचंड अग्नि व भयंकर देखावा पाहून सती जाण्याचें तिनें नाकबूल केलें तर तिचे आप्त तिला बळजोरीनें अग्नीमध्यें लोटून देत असत. कदाचित् त्या स्त्रीनें पळून जाण्याचा प्रयत्न केला तर ते दांड-क्यानें तिचें कपाळ फोडीत असत व तिला विस्तवांत ढकलून देत असत.

जर एखाद्या गुरख्यास आपल्या बायकोच्या वर्तनासंबंधानें कांहीं संशय आला किंवा ती व्यभिचारिणी आहे अशी त्याची समजूत झाली, तर तो तिला फार भयंकर शासन करितो. पहिल्यानें तो तिला घरांतच ठेवून तिची वाईट खोड घालविण्याचा प्रयत्न करितो व इतकेंही करून जर ती सुधारणेच्या मार्गास लागली नाहीं तर तिला जन्मकैदेची शिक्षा देण्यांत येते. जो व्यभिचारी पुरुष दुसऱ्याच्या स्त्रीवर नजर ठेवून तिच्या पातिव्रत्याचा भंग करण्याचा प्रयत्न करितो, अशा पुरुषाचें तें दुष्कृत्य जर त्या स्त्रीच्या नवऱ्यास समजलें, तर तो त्याला आपल्या स्त्रीशीं भाषण करीत असतांना पकडून आपल्या कुकरीनें छाटून टाकतो ! व्यभिचारामुळें आपल्या समाजाची फार अवनति होत आहे असें जेव्हां जंगबहादूर यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां त्यानीं या बाबतींत असा कडक कायदा केला कीं, जो कोणी परस्त्रीशीं प्रेमसंबंध ठेवील त्याला देहांत शिक्षा दिली जाईल. या कायद्याविरुद्ध जर एखाद्यानें वर्तन केलें तर त्याला न्यायाधीशापुढें नेऊन उभा करितात व त्याची चौकशी सुरू होते. चौकशींत तो मनुष्य जर खरोखरच अपराधी ठरला तर त्यानें ज्या स्त्रीशीं व्यभिचार केला असेल तिचा नवरा सर्वांसमक्ष त्याचें डोकें उडवितो. परंतु त्यापूर्वी अपराधी मनुष्यास

आपला प्राण वांचविण्याची एक सवलत देण्यांत येते. त्यास त्याच्या शत्रूपासून कांहीं अंतरावर उभा करितात व नंतर पळावयास सांगतात. त्याप्रमाणें तो पळूं लागला म्हणजे त्यास मारणारा हातीं शस्त्र घेऊन त्याच्या मागें लागतो. अशा प्रकारें पळतां पळतां तो अपराधी मनुष्य जर आपल्या शत्रूच्या हातीं लागला नाहीं, तर त्यास सोडून देतात. याशिवाय अपराध्यानें आपले प्राण वांचविण्याचे दुसरेही कांहीं मार्ग आहेत. परंतु या मार्गांनीं प्राणरक्षण करून घेणें नेपाळी लोक फार निंद्य समजतात. ते अशा वेळीं आपलें डोकें उडवून घेण्यास खुषीनें तयार होतील, परंतु आपल्या प्रियपात्राच्या पतीस कदापि शरण जाणार नाहींत. अपराध्यास पळून जाण्याची सवलत देण्यांत येते खरी, पण त्या सवलतीचा फायदा घेणें सोपें नाहीं. कारण तो पळूं लागला ह्मणजे प्रेक्षकांपैकीं एखादा मनुष्य आपला पाय आडवा घालून त्याला खालीं पाडल्याशिवाय रहात नाहीं. दुसरी सवलत, शत्रूच्या पायांखालून जाणें ही होय परंतु इतकें हीनत्व पतकरण्यास अभिमानी गुरखे क्वचितच तयार होतील. ज्या स्त्रीशीं व्यभिचार केल्याचा आरोप त्या मनुष्यावर करण्यांत आलेला असेल त्या स्त्रीनें जर, "यानें माझ्याशीं व्यभिचार केलेला नाहीं," असें भरकोर्टांत सांगितलें, तर मात्र त्याची ताबडतोब सुटका होते !

नेवारी लोकांची विवाहपद्धति गुरखे लोकांच्या विवाहपद्धतीहून फार भिन्न आहे. हिंदुस्थानच्या नेपाळेतर प्रांतांतील हिंदू लोकांच्या रिवाजाप्रमाणें, पुरुष किंवा स्त्री यांपैकीं कोणी तरी एक मरण पावल्याशिवाय नेवारी लोकांच्या विवाहसंबंधाचा दुसऱ्या कोणत्याही प्रकारें भंग होऊं शकत नाहीं. नवऱ्यानें आपल्या स्त्रीचा त्याग करणें, किंवा स्त्रीनें नवऱ्याचें घर सोडून दुसऱ्याचा हात धरून जाणें नेवारी लोक फार निंद्य समजतात. एखाद्या पुरुषानें किंवा स्त्रीनें एखादे वेळीं असें कृत्य केल्यास तें आपल्या जातीस मोठें लांच्छन आलें असें त्यांस वाटतें.



चुरिया येथील विश्रांतिगृह.



महाकाल.

नेवारी लोकांच्या मुली बाल्यावस्थेंत असतांनाच श्रीफळाबरोबर त्यांचा विवाह केला जातो, त्यामुळें त्यांच्या स्त्रीसमाजांत वैधव्यदशा मुळींच नाहीं. पुढें कन्या ऋतुमती झाल्यावर तिचीं वडील माणसें तिच्याकरिता एखादा चांगला नवरा शोधून काढतात व त्या दोघांचें लग्न करून देतात. पुढें त्या मुलीच्या मनांत जर आपल्या नवऱ्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें नाहीं व त्यामुळें वरचेवर कलह होऊं लागला तर वधू आपल्या नवऱ्याच्या उशीखालीं एक सुपारी ठेवून त्यास सोडचिठी देते व घरांतून निघून जाते! इतकें झालें ह्मणजे नवरा समजून चुकतो कीं आपल्या स्त्रीस आपण आवडलों नाहीं! अशा प्रकारें काडी मोडून देण्याची रीत नेवारी लोकांत जरी अगदीं नियमबद्ध झालेली आहे तरी इतक्या स्पष्टपणें आपल्या नवऱ्यास सोडून जाण्याचें धाष्टर्य नेवारी स्त्रिया क्वचितच करितात. त्यांतही अलीकडे हा काडीमोडीचा कायदा थोडासा कडक केला आहे. त्यामुळें पूर्वीं जशी वाटेल तेव्हां काडीमोड करतां येत होती तशी आतां करतां येत नाहीं. नेवारी लोकांत विधवाविवाहास बिलकुल प्रतिबंध नाहीं. शिवाय बाळपणींच श्रीफळाशीं लग्न होत असल्यामुळें त्यांच्या स्त्रिया कधींही विधवा होत नाहींत! लग्नाचा नवरा जरी मरण पावला तरी श्रीफळाशीं पूर्वीं विवाह झालेला असल्यामुळें, कपाळाचें कुंकू पुसून टाकण्याचें त्यांस बिलकुल कारण पडत नाहीं.

नेवारी जातीच्या स्त्रीनें जर व्यभिचार केला तर तिला थोडीशी शिक्षा देण्यांत येते. परंतु ज्या पुरुषाशीं तिनें व्यभिचार केलेला असेल त्याजकडून तिच्या नवऱ्यास लग्नाचा खर्च देवविला जातो; व हा खर्च सोसण्याची त्यास ऐपत नसली तर त्याला तुरुंगांत जावें लागतें. नेवारी लोकांत बहुपत्निकत्वाची चाल जारीनें सुरू आहे. एका नेवारी राजास ३००० स्त्रिया होत्या असें ह्मणतात.

नेवारी लोक हिंदू लोकांप्रमाणेंच आपलीं प्रेतें जाळतात व त्यांच्यांत सती जाण्याचीही चाल आहे. परंतु विधवाविवाहाचें प्राबल्य असल्यामुळें नेवारी स्त्रियांस सती जाण्याचा प्रसंग क्वचितच येतो.

# १० शासनपद्धति

प्राचीनकाळीं, नेपाळांतल्या एखाद्या मनुष्यानें जरी एखादा क्षुल्लक अपराध केला तरी त्याचे हात, पाय, नाक, कान आणि डोळे यां-पैकीं एखादा अवयव कापून टाकण्याची शिक्षा त्यास देण्यांत येत असे; येवढेंच नव्हे तर क्वचित् प्रसंगीं अशा मनुष्यांस देहांत शिक्षाही दिली जात असे. याशिवाय वेतानें फटके मारण्याची व अपराधी मनुष्याची कातडी दोरानें शिवण्याचीही भयंकर चाल प्रचारांत होती. परंतु जंग-बहादूर हे विलायतेस जाऊन आले त्या वेळीं असले कडक शिक्षा देणारे कायदे त्यांनीं अजिबात रद्द करून टाकले व पुढील नवे कायदे अमलांत आणिलेः—जो मनुष्य राजद्रोह करील, किंवा राजकीय कामांत विश्वासघाताचें वर्तन करील, अथवा युद्ध चालू असतां आयत्या वेळीं माघार घेऊन पळून जाईल, त्यास जन्मठेप काळेंपाणी किंवा शिरच्छेद ही शिक्षा दिली जाईल. जर कोणी सरकारी कामदार प्रजे-कडून लांच घेईल, सरकारच्या हितसंबंधांत अडथळा येण्यासारखें वर्तन करील किंवा सरकारी पैशाची अफरातफर करील, तर त्याला फार मोठा दंड केला जाईल व बडतर्फ करून तुरुंगांत पाठविलें जाईल. गाय अथवा मनुष्य यांची हत्या करणारास शिरच्छेदाची शिक्षा दिली जाईल. कोणी शस्त्रानें गाईची कातडी काढील अथवा रागानें तिचा वध करील तर त्याला जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा दिली जाईल. याशिवाय क्षुल्लक प्रतीच्या अपराधास दंडाच्या व अल्प मुदतीच्या कैदेच्या शिक्षा देण्यांत येतात. एखाद्या नीच जातीच्या मनुष्यानें आपण उच्च जातीचे आहों असें भासवून लोकांस फस-विण्याचा किंवा एखाद्या उच्च जातीच्या मनुष्यास जातिभ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला तर त्यास दंड आणि कैद या दोन्ही शिक्षा देण्यांत येतात

अथवा त्याची मिळकत सरकारांत जमा केली जाते. याहून भयंकर अपराध केल्यास अपराधी मनुष्यास गुलाम ह्मणून विकून टाकण्यांत येत असे, परंतु ही गुलामाची चाल आतां बंद करण्यांत आली आहे. जे लोक धर्मबाह्य वर्तनानें जातिभ्रष्ट होतात ते उपास व व्रतें करून किंवा पुरोहितांस द्रव्यदान करून पुनः आपल्या जातींत येतात.

ब्राह्मण व स्त्रिया यांस शिरच्छेदाची शिक्षा दिली जात नाहीं. स्त्रियांनीं जर सर्वांत मोठा ह्मणजे गांय किंवा मनुष्य यांचा वध करण्याचा गुन्हा केला तर त्यांस जन्मकैदेची शिक्षा देण्यांत येते. ब्राह्मण जातीच्या गुन्हेगारासही हाच नियम लागू आहे. शिवाय कोणताही ब्राह्मण एक वेळ तुरुंगांत गेला कीं जात व जातिगौरव या दोहोंसही त्यास मुकावें लागतें.

## ११ पोषाक

गुरखे लोकांचा नेहमींचा पोषाक ह्मटला ह्मणजे पायांत पांढऱ्या किंवा निळ्या रंगाचा पायजमा, अंगांत निळें कुडतें, डोक्यास निळें शिरस्त्राण व कंबरेसभोंवतीं कित्येक हात लांबीचा निळा कंबरबंद गुंडाळावयाचा. या कंबरबंदांत एक मोठा सुरा लटकावून देण्यांत येतो, त्याला नेपाळांत कुकडी असें म्हणतात. गुरखे लोक आपल्या गुडघ्याखालचे पाय लोंकरीच्या कापडाच्या पट्टयानें आच्छादितात. पादत्राणें विकत घेण्याचें ज्यांस सामर्थ्य असेल ते पादत्राणें वापरतात व इतर लोक अनवाणी चालतात. एका जातीच्या गवतापासून केलेले जोडेही कांहीं लोक वापरतात. थंडीच्या दिवसांतही गुरखे लोक हेच कपडे वापरतात परंतु त्यांच्या आंतील बाजूस लोंकर किंवा कापूस लावून घेतात.

नेवारी लोक धोतरें नेसतात किंवा इजारी घालतात व थंडीच्या दिवसांत जाड सुताच्या कापडाचे किंवा लोंकरीचे पायजमे वापरतात. कांहीं लोक आंगरखाही वापरतात व नेपाळांत त्याला अचकन असें ह्मणतात. त्यांच्यात जे व्यापारांवर श्रीमंत झालेले आहेत व ज्यांस वरचेवर तिबेटांत जावें लागतें असे लोक चुण्या घातलेला पायजमा, उंची कापडाचा लांब आंगरखा, व लोंकरीच्या टोप्या वापरतात. 'हरिसिद्धि' नामक ठिकाणीं राहणारे नेवारी लोकं, स्त्रियांच्या घागऱ्याप्रमाणें किंवा संन्याश्याच्या कफनीप्रमाणें, पायांच्या टांचेपर्यंत लांब आंगरखा घालितात. हे लोक ज्या टोप्या वापरतात त्या काळ्या कपड्याच्या बनविलेल्या असून त्यांच्या आंतील अंगास कापसाची मऊ गादी लाविलेली असते.

नेपाळच्या राजघराण्यांतील लोकांचा पोषाक एका विशिष्ट तऱ्हेचा असून, तसा पोषाक नेपाळांत दुसरीकडे कोठेंही दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. हा पोषाक फार मूल्यवान् व मोठा भपकेबाज असतो. नेपाळांतील राजपुरुष मोत्यांनीं आणि हिऱ्यांनीं मढविलेलीं कलाबतूचीं मंदिलें किंवा मुकुट आपल्या मस्तकीं धारण करितात. नेपाळचा माजी प्रधान सर जंगबहादूर हा आपल्या मस्तकावर जो मुगुट घालीत असे त्याची किंमत १॥ लक्ष रुपये होती ! हे राजकुलोत्पन्न पुरुष, कांठावर उंची कलाबतूची वेलबुट्टी काढलेले रेशमी आंगरखे आपल्या अंगांत घालितात, पायांत पायजमा व पादत्राण घालतात व कंबरेसभोंवतीं गुंडाळलेल्या दुपेट्यास कुकडी लटकावून देतात. प्रत्येकानें तलवार धारण केलीच पाहिजे असा नियम आहे. नेपाळी सैन्यांतील सेनापति, इंग्रजी लष्करातील सेनापतीसारखा पोषाक करितात. राजघराण्यांतील लोक शिवाय करून, नेपाळांतील इतर सर्व जातींच्या लोकांचा पोषाक बहुधा वर लिहिल्याप्रमाणें असतो, तथापि स्थानपरत्वें कांहीं जातींच्या लोकांच्या पोषाकाची तऱ्हा

याहून निराळी आढळते. नेपाळांतील सर्व जातींच्या स्त्रिया एक प्रकारचा चुण्या घातलेला घागरा वापरतात. या घागऱ्याचा पुढील भाग जमिनीवर लोळण्याइतका लांब असतो, व मागचा भाग आंखूड असतो. राजघराण्यांतील स्त्रिया व श्रीमंत लोकांच्या बायका जो घागरा नेसतात त्यास ६० पासून ८० गज लांबीचें कापड लागतें. हें कापड फार बारीक असतें. परंतु श्रीमंत लोकांच्या बायका असल्या पोषाकांत कधींही बाहेर पडावयाच्या नाहींत. फक्त आपल्या कुलाची मर्यादा कायम ठेवण्याकरितांच त्या असला पोषाक करतात व त्यामुळें त्यांस इतर स्त्रियांकडून मोठा मान मिळतो. याशिवाय, नेपाळी स्त्रिया इतर हिंदू स्त्रियांप्रमाणें साडी अथवा शालूही परिधान करितात. परंतु शिरस्त्राणादाखल एखाद्या विशेष कपड्याचा उपयोग करण्याची त्यांची चाल नाहीं. नेवारी स्त्रिया आपल्या केंसांचे बुचडे बांधतात, परंतु इतर जातींच्या स्त्रिया आपल्या केंसांच्या वेण्या घालून त्या तशाच पाठीवर लोंबत ठेवतात. कांहीं स्त्रिया एखादें कृत्रिम रेशमी फूल आपल्या वेणीच्या शेवटास अडकवितात. नेपाळांतील सर्व जातींच्या स्त्रियांस कपड्यालत्त्याची व दागदागिन्याची फार आवड आहे; व यथाशक्ति, निरनिराळ्या प्रकारच्या कपड्यांनीं आपलें शरीर शृंगारण्यांत त्यांस मोठा आनंद वाटतो. श्रीमंत लोकांच्या स्त्रिया आपलें सौंदर्य अधिक खुलून दिसावें या हेतूनें डोकींत सोन्याचीं फुलें, गळ्यांत सोन्याच्या मण्यांच्या किंवा मोत्यांच्या माळा, हातांत आंगठ्या, कानांत बाळ्या व कर्णफुलें व नाकांत नथ घालतात. जे लोक मोठे श्रीमंत आहेत त्यांच्या स्त्रिया हिऱ्यामोत्यांचे व सोन्याचे दागिने घालतात. भोटिया जातीच्या असभ्य स्त्रिया आपल्या दागिन्यांत निरनिराळे मूल्यवान् पाषाण व मोत्यें यांचाच उपयोग फार करितात.

नेपाळी स्त्रियांस सुवासिक फुलांचा फार शौक आहे. फुलांचे गजरे करून ते घालणें त्यांस फार आवडतें. सणांच्या दिवशीं तर नेपाळी

स्त्रिया आपल्या डोक्यांत इतकीं फुलें घालतात कीं, त्यांच्या मस्तकावर एखादें फूलझाड फुललें आहे कीं काय असेंच एखाद्यास वाटेल ! नेपाळांतील वारांगनाही फुलांचा फार उपयोग करतात. एखाद्या नेपाळी स्त्रीनें एखाद्या झाडावर एखादें फूल पाहिलें तर तें तोडून घेतल्याशिवाय पुढें पाऊल टाकणें तिच्या जिवावर येतें !

हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय लार्ड डफरिन यांच्या पत्नी लेडी डफरिन यांनीं, नेपाळचे माजी प्रधान रणदीपसिंग यांच्या राणीच्या पोषाकाचें दिलेलें वर्णन येथें उद्धृत करून हा भाग संपवितों. लेडी डफरिन लिहितात, "राणीचें जें दृश्य माझ्या दृष्टीस पडलें तें सूक्ष्म रीतीनें वर्णन करण्यासारखें आहे. अगदीं पहिल्यानेंच जेव्हां मी तिला पाहिलें तेव्हां तिचा वरचा भाग तलम जाळिदार कापडानें वेष्टिलेला व खालीं पाय पांढऱ्या रंगाच्या सैल इजारीनें झांकलेले, असें तिचें स्वरूप माझ्या दृष्टीस पडलें. तिला कोचावर बसविण्यांत आल्यावर तिचें सूक्ष्म अवलोकन करण्यास मला वेळ मिळाला. बारीक गुलाबी व पिवळे पट्टे असलेला बंडीवजा एक झगा दिसत होता. तो कसा घातला होता व त्याला किती शेंकडे वार कापड लागलें होतें याची कांहींच कल्पना होण्यासारखी नव्हती. एखादा कापडाचा टाका जमिनीवर उलगडून ठेवला आहे व त्याचा अर्धा भाग राणीनें आपल्या अंगासभोंवतीं गुंडाळला असून अर्धा तिनें उचलून धरला आहे असें तो देखावा पाहून मला वाटलें ! ती खालीं बसली ह्मणजे त्या झग्याचा घेर अमर्याद पसरे व उठून उभी राहिल्यावर तो झगा तिनें आपल्या खाकेंत घेतला ह्मणजे त्याच्या घेरामुळें, तिच्या पायांतल्या तुमानीशिवाय, इतर कांहींच दिसत नसे ! ती हलक्या अंगाची असून तिनें आपल्या हातांत बिनबोटांचा गुलाबी हातमोजा घातला होता. दुसरी आश्चर्यकारक गोष्ट ह्मटली म्हणजे तिचें डोकें होय. डोक्यावरील केंस काळेभोर असून ते मागल्या बाजूनें विंचरलेले होते व त्यांच्या वेण्या घालून, त्या पुढील बाजूस एकावर एक अशा रचलेल्या होत्या !

# १२ नेपाळचा प्रवासमार्ग

नेपाळांत जाण्याचा सर्वोत्कृष्ट आणि सोईचा मार्ग ह्मटला ह्मणजे रक्षालमधून गेलेला रस्ता होय. रक्षाल हें ठिकाण चंपारण्य जिल्ह्यांत असून येथून काटमांडू शहर ७५ मैल आहे. वाटेंत, नाना प्रकारचे जंगली देखावे अरण्यें, सपाट मैदानें, नद्या, नद्यांचीं कोरडीं पात्रें, वांट, पर्वत आणि दऱ्या इतस्ततः दृष्टीस पडतात. हें ७५ मैलांचें अंतर तोडण्यासाठीं आपणास माहीत असलेल्या आणि माहीत नसलेल्या अनेक वाहनांचा उपयोग करावा लागतो. हत्ती, घोडे, गाढवें, अनेक प्रकारच्या पालख्या व स्वतःचे पाय या सर्वांच्या साहाय्यानें हा प्रवास करावा लागतो. पालख्यांत खटाकळी ऊर्फ चारपाई, दांडी ऊर्फ 'गालिचा' वगैरे अनेक जाती आहेत. सर्वांत विचित्र अशी प्रवासाची तऱ्हा ह्मटली ह्मणजे, पहाडी जातीच्या मजुराच्या खांद्यावरील बळकट टोपलींत सामानाप्रमाणें बसून जाणें ही होय.

इंग्रज सरकारचा मुलूख आणि नेपाळ यांच्यामधील सरहद्द एका पुलापासून सुरु होते. या पुलाचा अर्धा भाग ब्रिटिश हद्दींत व अर्धा नेपाळ हद्दींत असून त्याचा अर्धा खर्च ब्रिटिशांनीं व अर्धा नेपाळ सरकारनें सोसलेला आहे! नेपाळांतील पहिलें ठिकाण बीरगंज हें एक सामान्य गांव असून तेथें नेपाळ सरकारचा सुभा राहतो. प्रवासी लोकांच्या सोईसाठीं येथें एक 'दरबार रेस्टहौस' ( सरकारी धर्मशाळा ) आहे. डोली किंवा पालखी वगैरे वाहनांची तजवीज ज्याचा त्यानें केली पाहिजे. हीं वाहनें वाहून नेणारे लोक भीमफेडीपर्यंत जातात. भीमफेडी येथून पुढें जाण्यासाठीं अन्य तऱ्हेचें वाहन उपयोगांत आणावें लागतें व तें वाहून नेणारे पहाडी लोक असतात. वीरगंजपासून पुढें कांहीं मैल रस्ता अगदीं सपाट मैदानांतून जातो व

नंतर एकदम नेपाळची प्रसिद्ध तराई सुरू होते. अत्युच्च वृक्ष, त्रासदायक उष्ण हवा व घनदाट काळोख, यांमुळें हा तराईचा वनप्रदेश बराच अनुल्लंघनीय झाला आहे. या तराईंतून दहा मैलांचा प्रवास केल्यानंतर बिचाखोरी येथील बंगल्याजवळ प्रवासी येऊन दाखल होतो. या ठिकाणची हवा इतकी अनारोग्यकारक आहे कीं प्रवाश्यानें येथें एक रात्रभर मुक्काम करणें किंवा तेथील नळाचें पाणी पिणें देखील धोक्याचें आहे असें ह्मणतात. कारण तसें केल्यानें 'आवल चुरिया' या नांवाचा भयंकर जातीचा घातक मलेरिया ताप येण्याचा फार संभव आहे. बिचाखोरी येथून पुढील मुक्कामाचें ठिकाण ७ मैलांवर आहे, परंतु रस्ता फार खडकाळ व तोही एका मोठ्या नदीच्या पात्रांतून गेलेला असल्यामुळें वाहनें घेऊन जाणारे लोक तासीं एक मैलाहून अधिक प्रवास करूं शकत नाहींत. चुरिया येथील धर्मशाळा ज्या ठिकाणीं आहे तें ठिकाण फारच रमणीय आहे. चारी बाजूंस उंच पर्वत लागलेले असून त्यांवर दाट जंगल वाढलेलें आहे व त्यामुळें बंगल्याची पार्श्वभूमी फार नयनमनोहर दिसते. चुरिया येथून दुसऱ्या एका खडकाळ नदीच्या पात्रांतून आणखी कांहीं मैल प्रवास केल्यानंतर प्रवासी हेटोंवा येथें येतो. तेथून पुढें थोड्या अंतरावर सुपारीतंद नामक ठिकाण आहे. तेथें एक सुंदर नदी असून तिच्यावर एक सोइस्कर झुलता पूल आहे. येथून पुढें देखावा बदलतो व तो अधिकच मनोहर दिसूं लागतो. हा रस्ता पर्वताच्या एका अरुंद खिंडींतून एका विशाल नदीच्या कांठानें जातो व सर्व रस्ताभर नदीच्या प्रवाहाचा प्रचंड खळखळाट एकसारखा ऐकूं येतो. चारी बाजूंस असलेले उंच पहाड व त्यांच्या शिखरांवरील प्रचंड वृक्ष यांच्या योगानें एकंदर दृश्य फारच मनोवेधक दिसतें; व तें पाहून प्रवाश्याच्या मनांत भय आणि आनंद या दोन्ही विकारांचा उद्भव एकसमयावच्छेदेंकरून होतो. भीमफेडीच्या पुढें २००० फूट उंचीचा एक खडा चढाव. चढून गेल्यावर

सिसागढी नामक किल्ला लागतो; व तेथील कस्टम खात्याचे लोक प्रवाश्याचा परवाना ( Passport ) व सामानसुमान तपासतात. येथून पुढें कित्येक मैलपर्यंत सारखा उतार लागलेला असून तो एकंदर प्रदेश फार रमणीय आहे. वाटेंत पुष्कळ ओढे लागतात. मार्कू नामक ठिकाणाच्या पलीकडे चितलुंग नामक खिंड लागते. या खिंडीला 'धाकटें नेपाळ' असेंही म्हणतात. ही खिंड चंद्रगिरी पर्वतापर्यंत आहे. चंद्रगिरी पर्वत २००० फूट उंच आहे. असंख्य वांकड्यातिकड्या वाटांनीं व ओबडधोबड दगडी पायऱ्यांवरून हा चंद्रगिरी पहाड ओलांडल्यावर प्रवासी खुद्द नेपाळच्या अंतर्वेदींत येऊन पोंचतो. येथून काटमांडू फक्त ७ मैल आहे. वाटेंत विष्णुमती व कालीमती या नद्या लागतात. चंद्रगिरी घाटाच्या शिखरावरून समोरचा भूभाग कमालीचा मनोवेधक दिसतो. मुख्य हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांच्या रांगा, त्यांहून कमी उंचीच्या परंतु दाट जंगलानें भरलेल्या टेंकड्या, आणि खालीं एखाद्या स्वप्नांतील देखाव्याप्रमाणें दिसणारी व काटमांडू, पाटण आणि भाटगांव या तीन शहरांतील इमारतींनीं आणि स्वयंभुनाथ व बोधनाथ येथील उंच चैत्यांमुळें शोभायमान् वाटणारी नेपाळची अंतर्वेदी, यांच्या देखाव्यानें प्रवाश्याच्या चित्तवृत्ति अगदीं वेडावून जातात.

## १३ प्रमुख शहरें व प्रेक्षणीय स्थळें

नेपाळची राजधानी जें काटमांडू शहर त्या ठिकाणीं महत्त्वाचीं प्राचीन स्थळें, देवालयें आणि तीर्थें आहेत. काटमांडूचें जुनें नांव मंजुपट्टण होतें असें म्हणतात. मंजुश्री देवानें हें शहर वसविलें म्हणून त्याचें नांव मंजुपट्टण, असें बौद्ध लोक समजतात. नेपाळांत राखून ठेवलेल्या जुन्या हस्तलिखितांवरून काटमांडूचें प्राचीन नांव कांतिपुर

असल्याचें समजतें. नेवारी लोक काटमांडू येथें अद्याप एक प्राचीन लांकडी इमारत दाखवितात व तिला 'काथमांडू' अथवा 'काष्टमंडप' असें म्हणतात, व याच इमारतीवरून शहरास 'कांटमाडू' हें नांव पडलें असें सांगतात. इ. स. १५९६ त मल्लराजा लक्ष्मीन्द्र यानें ही इमारत बांधली. काटमांडू शहरासभोंवतालीं पूर्वी तट होता व त्याला ३२ दरवाजे होते. यापैकीं कांहीं दरवाज्यांचे अवशेष अद्याप दृष्टीस पडतात. हें शहर पूर्वी ३२ भागांत विभागलेलें होतें, व त्या भागांस 'टोल' अशी संज्ञा होती. ज्या दरवाज्याजवळ जो टोल होता त्या दरवाज्याचें नांव त्या टोलीस देण्यांत आलें होतें. उदाहरणार्थ, असान टोल, धोका टोल, इंद्रचौक, टोबा टोल, लाघन टोल वगैरे.

कांटमाडू शहराची लांबी सुमारें १ मैल व रुंदी ¼ ते ⅓ मैल असून लोकसंख्या सुमारें ४०,००० आहे. शहराची रचना त्रिकोणाकार आहे. बौद्ध धर्मीय लोक असें सांगतात कीं, मंजुश्री नामक बौद्धधर्मीय योद्ध्यानें आपल्या खड्गाच्या आकाराप्रमाणें या शहराची रचना केली आहे, व हिंदू लोक म्हणतात कीं ही रचना भवानीच्या तलवारीप्रमाणें करण्यांत आली आहे! दरबार चौकांत मुख्य राजवाडा असून त्याचे उत्तरेस तालिजुमंदिर नामक देवालय, दक्षिणेस वसंतपुर व नवा दरबार महाल, पूर्वेस राजोद्यान, हस्तिशाला व अश्वशाला व पश्चिमेस सिंहदरवाजा आहे. या चौकांत नेवारी लोकांचीं जुन्या पद्धतीचीं घरें दृष्टीस पडतात. या स्थळाला 'हनुमान ढोका' असेंही म्हणतात. कारण दरबारमहालासमोर हनुमंताची एक बरीच मोठी मूर्ति आहे. ह्या दरबारमहालाची रचना थोडी चमत्कारिक असून त्यांत भुलभुलावणीसारखे-चक्रव्यूहासारखे-मार्ग, व मोठमोठ्या खोल्या आहेत. शिवाय ४०।५० चौक असून त्यांना निरनिराळीं नांवें आहेत. एका चौकांतून दुसऱ्या चौकांत जाण्यास लहानलहान दरवाजे आहेत. त्यामुळें, धोक्याच्या वेळीं आंतील लोकांस निरनिराळ्या चौकांच्या आश्रयानें

बाहेरील मोठ्या फौजेस तोंड देऊन स्वतःचें संरक्षण करितां येत असे. या महालांत आजपर्यंत असंख्य राजकारस्थानें व शेंकडों कत्तली झालेल्या आहेत व यामुळें नेपाळी लोकांना व इतर प्रवाश्यांना या राजमहालाच्या दर्शनानें अद्यापही एक प्रकारची भीति वाटते.

काटमांडूमधील पशुपतिनाथाचें मंदिर हें मोठें क्षेत्रस्थान आहे व त्यांतील चतुर्मुख शिवलिंगाच्या दर्शनार्थ आणि चार दिवस उत्सवाची मौज पाहण्यास, शिवरात्रीच्या दिवशीं हिंदुस्थानच्या सर्व भागांतून हजारों लोक येथें जमा होतात. या उत्सवासाठीं नेपाळांत जाण्यास, नेपाळ सरकाराकडून सर्व लोकांस १५ दिवस सदर परवानगी दिली जाते. हिंदू लोकांची या क्षेत्रस्थानाविषयीं इतकी पूज्यबुद्धि आहे कीं, पशुपतिनाथाच्या मंदिराजवळून वाहत जाणाऱ्या बाघमती नदीच्या जलांत आपले पाय सोडून तेथेंच देह टाकावा, अशी बहुतेक हिंदु लोकांची शेवटची इच्छा असते. हें मंदिर कोणी बांधलें याविषयींची नक्की माहिती मिळत नाहीं, पण तें फार प्राचीन असलें पाहिजे यांत संशय नाहीं. राजा यक्षमल्ल याला वेदांततत्त्वज्ञानाची फार आवड असून त्यानें दाक्षिणेंतून भट्ट या नांवाचे कांहीं ब्राह्मण नेपाळांत नेले व पशुपतिनाथाच्या पूजेचें काम त्यांजकडे सोपविलें. तेव्हांपासून या ब्राह्मणांच्या कित्येक पिढ्या नेपाळांत गेल्या आहेत. पुढें राजा महेंद्रमल्ल यानें वरील शिवलिंगावर एक मंदिर उभारलें व तें अद्यापपर्यंत टिकाव धरून राहिलें आहे.

चांगू नारायणः—पशुपतिनाथाच्या मंदिरापासून पुढें चार मैलांवर चार खेडीं असून त्यांपैकीं प्रत्येक खेड्यांत विष्णूचें एकेक मंदिर आहे. या चारी खेड्यांच्या समुदायास चांगुनारायण असें ह्मणतात. हें स्थळ मनोहरा नदीच्या कांठीं आहे. या चारी नारायणमूर्तींचें एका दिवसांत दर्शन घेतलें असतां मोठें पुण्य मिळतें असा नेपाळी लोकाचा समज

असल्यामुळें पडेल तो त्रास सहन करून शेंकडों भाविक लोक हें पुण्य संपादन करीत असतात. या चारी मूर्तींचीं नांवें अशीं आहेतः— चांगु नारायण, बिशंकुनारायण, शिखरनारायण व एचगुनारायण काटमांडू येथून निघून या चारी देवांचें दर्शन घेऊन परत येण्यास ४४ मैलांचा प्रवास करावा लागतो! काटमांडूहून पशुपतिनाथाच्या मंदिराकडे जातांना वाटेंत गुह्यकाली नामक देवीचें देवालय असून, हिंदू लोकांची त्याविषयीं मोठी पूज्यबुद्धि आहे. हें एक पीठस्थान आहे असें समजण्यांत येतें. विष्णूच्या सुदर्शन चक्रानें पार्वतीच्या देहाचीं शकलें केलीं त्या वेळीं तिचा नितंबभाग या ठिकाणीं पडला असें ह्मणतात!

काटमांडूच्या आग्नेयीस १२ मैलांवर दक्षिणाकाली या नांवाचें एक पवित्र स्थल आहे. अनुल्लंघनीय अरण्य व उंच पर्वत यांनीं परिवेष्टित असलेलें हें स्थळ फारच रमणीय आहे. येथील सृष्टिसौंदर्यही फार बहारीचें आहे. जवळूनच एक लहानशी नदी वाहते. या ठिकाणीं रानटी जनावरांची फार भीति असल्यामुळें रात्रीच्या वेळीं येथें राहण्यास कोणी धजत नाहीं. देवीची मूर्ति एका उघड्या चौकांत असून तिचें नांव चामुंडा आहे. तिला पशूचा बळी द्यावा लागतो. रेडे, बकरे, वगैरे हजारों जनावरें दरवर्षी येथें बळी दिलीं जातात व जेवणाचा थाट तर बहुधा प्रत्येक दिवशीं चालू असतो.

हीं उपरिनिर्दिष्ट स्थलें जरी हिंदुलोकांस विशेष पूज्य आहेत तरी प्रसंगविशेषीं बौद्ध धर्मीय लोकही या देवतांची उपासना करितात. यांशिवाय लहानसहान देवळें पुष्कळच आहेत, परंतु स्थल—कालाभावीं त्यांचा उल्लेख मला येथें करितां येत नाहीं.

बौद्धधर्मीय लोकांचीं जीं अनेक पवित्र स्थानें आहेत त्या सर्वांत स्वयंभूनाथ हें स्थान फार महत्त्वाचें आहे. या ठिकाणीं, काटमांडू शह-

राच्या पश्चिमेस एक मैलावर, २५० फूट उंचीच्या एका टेंकडीच्या माथ्यावर एक प्रचंड चैत्य आहे. तेथपर्यंत चढून जाण्यास ५०० दगडी पायऱ्या असून, पायथ्याशीं बुद्धांचे कित्येक प्रचंड पुतळे आहेत. मुख्य इमारत ह्मणजे ६० फूट घेराचा, माती व विटा यांनीं बांधलेला मजबूद घुमट असून त्यांत अक्षोभ्य, अमिताभ, अमोघसिद्धि आणि रत्नसंभव या चार ध्यानी बुद्धांच्या मूर्ति आहेत. वैरोचन बुद्धाची जागा मध्यभागीं आहे या कल्पनेमुळें त्याची मूर्ति ठेवलेली नाहीं. स्वयंभूपुराणांत असें लिहिलें आहे कीं, हा स्वयंभूनाथाचा चैत्य आदिबुद्धाच्या शाश्वत टिकणाऱ्या तेजाचें रक्षण करतो. बौद्ध लोकांच्या दृष्टीनें हें स्थळ फार पवित्र असल्यामुळें नेपाळांतील सर्व बौद्धधर्मीय लोक तर या ठिकाणीं जमतातच, पण शिवाय तिबेटांतिल लामा लोकही येथें देवदर्शनास येतात.

अशाच प्रकारचें दुसरें स्थल बोधनाथ हें असून तें काटमांडू शहराच्या पूर्वेस कांहीं मैलांवर आहे. स्वयंभूनाथाइतकें जरी हें स्थल रमणीय नाहीं तरी तेथील सृष्टिसौंदर्यही पाहण्यासारखें आहे. हा गांव पशुपतिनाथ व काटमांडू यांच्या दरम्यान वसलेला असून त्याची रचना चक्राकार आहे. मध्यभागीं एक मोठा बौद्ध चैत्य असून त्यांतील वेदी विटांनीं बांधलेली आहे. वर मोठा घुमट असून त्याचा कळस पितळेचा आहे. मंदिराचा व्यास १०० गज असून आंत बौद्ध देवतांच्या प्रतिमा ठेवलेल्या आहेत. नेपाळांतलि भोटिये लोक व तिबेटी बौद्ध लोक यांचा या मंदिराविषयीं मोठा पूज्यभाव आहे. या मंदिराच्या वार्षिकोत्सवप्रसंगीं या ठिकाणीं ताईत व धातूंचे गळपट्टे यांचा मोठा खप होतो. विशेषतः भोटिये लोक हे जिन्नस फार उपयोगांत आणितात.

वरील दोन चैत्यांशिवाय, तिसरा एक लहान परंतु फार सुंदर असा चैत्य काटमांडू शहराच्या मध्यभागीं असून त्याला ‘ काठे सिंभू ’ असें ह्मणतात.

चांगू नारायणाच्या पलीकडे संकू नामक ठिकाणीं, मणिचूड पर्वतावर वज्रयोगिनी या नांवाची बौद्ध लोकांची एक देवी असून, वैशाख शुद्ध ३ पासून तिची यात्रा सुरू होते. ही यात्रा बौद्ध लोक साजरी करितात. अलीकडे कांहीं हिंदू लोकही या देवीस भजूं लागले आहेत. संकू गांव मणिचूड पहाडाच्या पायथ्याशीं असून, पहाडाच्या शिखरापर्यंत दगडी पायऱ्या आहेत व त्या चढून जाण्यास सुमारें अर्धा तास लागतो. शिखरावर दाट झाडी असून, वज्रयोगिनीच्या देवालयासह कांहीं लहान इमारती तेथें आहेत. वज्रयोगिनीच्या देवळासमोर खड्गयोगिनी नामक दुसऱ्या एका देवीचें मंदिर आहे. देवीच्या मूर्तीसमोर सदोदित विस्तव पेटलेला असतो व तेथें मनुष्याचें एक दगडी रुंड पडलेलें दृष्टीस पडतें.

काटमांडूपासून थोड्या अंतरावर असलेल्या पाटण शहरांतील देवालयें आणि पवित्र स्थानें पुष्कळ आहेत; त्याचप्रमाणें जुनीं ऐतिहासिक स्थळें व बौद्ध लोकांचे विहारही अनेक आहेत. एक जुना चैत्य आहे तो राजा अशोक यानें उभारला असें म्हणतात. पाटण येथें जेव्हां नेपाळची राजधानी होती तेव्हां तें शहर मोठ्या भरभराटींत होतें परंतु हल्लीं त्याची लोकसंख्या कमी होत चालली असून जुन्या इमारती व स्मारकें मोडकळीस येऊं लागलीं आहेत.सबंध नेपाळांत एकच ख्रिस्ती मिशन असून तें पाटण येथें आहे. हें मिशन पूर्वीं तिबेटांत गेलें असतां तिबेट सरकारनें त्याला हांकून लावलें, तेव्हां त्यानें नेपाळांत येऊन पाटण येथें आपलें ठाणें दिलें. पाटण येथें एक प्रचंड राजवाडा असून तो ज्या चौकांत आहे त्याला दरबारचौक असें म्हणतात. या चौकाच्या चारी बाजूला देवालयें आणि जुनीं स्मारकें असून त्यांचें लांकडी कोरींव काम मोठ्या कलाकुसरीचें आहे. पाटण शहराचें दुसरें नांव "ललितपट्टण" हें असून तें काटमांडूच्या दक्षिण व पूर्व या दिशांच्या मध्यें पाऊण कोसावर बाघमती नदीच्या दक्षिणतीरीं वसलेलें आहे.

गुरखा राजवंशाच्या हातीं नेपाळची राजसत्ता जाण्यापूर्वी नेपाळांत जीं तीन प्रमुख राज्यें होतीं त्यांपैकीं एकाची राजधानी पाटण शहर होतें.

पाटणसारखीच भाटगांव शहराची स्थिति झालेली असून तेंही दिवसें दिवस खालावत चाललें आहे. तथापि अद्याप कांहीं जुनीं देवालयें व स्मारकें या शहरांत असून, एक मोठा भव्य राजवाडा आहे. त्याचा दरवाजा सोनेरी आहे. शिवाय एक दरबारचौकही या ठिकाणीं आहे.

कीर्तिपुर हें शहर काटमांडूच्या उत्तरेस तीन मैलांवर आहे. गुरखा राजा पृथ्वीनारायण यानें हें शहर काबीज केलें तेव्हांपासून त्याला सारखी उतरती कळा लागली आहे. या शहरांतील नेवारी लोकांनीं पृथ्वीनारायणाचा तीन वेळां पराभव केला होता. हें शहर पूर्वी एका स्वतंत्र राज्याची राजधानी होती, परंतु पुढें तें राज्य पाटण येथील राजानें जिंकून आपल्या राज्यास जोडिलें. हें शहर सपाट जमिनीपासून ४०० फूट उंचीवर वसलेलें असून तेथील किल्ला केवळ अभेद्य आहे अशी प्रसिद्धि आहे. इ. स. १७६५ पासून १७६७ पर्यंत राजा पृथ्वीनारायण यानें या शहरास वेढा दिला होता, परंतु केवळ युद्ध करून शहर घेणें अशक्य वाटल्यामुळें त्याला शेवटीं विश्वासघातानें शहर घेणें भाग पडलें ! अशा रीतीनें नगरांत प्रवेश होतांच, पृथ्वीनारायणानें शहरांतील पुष्कळ मनुष्यांस नासिकाच्छेदाची शिक्षा दिली व ती तत्काळ अमलांत आणली ! म्हातारे, स्त्रिया व चौदांवर्षांतील मुलें यांजवरसुद्धां त्यानें दया केली नाहीं !! मात्र बांसरी ( मुरली ) वाजविण्यांत जे लोक कुशल होते त्यांस ही शिक्षा माफ करण्यांत आली होती. या वेळीं फादर गेसनी नामक एक पाद्री कीर्तिपुर येथें राहत असे, त्यानें आपल्या नेपाळच्या इतिहासांत पृथ्वीनारायणाच्या या

क्रूर कृत्याच्या पुष्कळ गोष्टी लिहिल्या आहेत. कापलेल्या नाकाची संख्या ८६५ व त्यांचें वजन ८० पौंड भरलें असें म्हणतात ! ही गोष्ट घडल्यानंतर ३० वर्षांनीं कर्नल पॅट्रिक नामक इंग्रज योद्धा नेपाळांत गेला होता. त्यानेंही कीर्तिपुर शहरांत आपण पुष्कळ नाक कापलेले लोक पाहिल्याचें लिहून ठेवलें आहे. राजा पृथ्वीनारायण याच्या आज्ञेवरून या शहरास 'नासकाटापुर' असेंही म्हणतात. हें शहर गुरखे लोकांच्या हातीं गेल्यापासून त्याचा विध्वंस होत चालला आहे, तथापि देवळें व इतर प्राचीन इमारती यांस मात्र अद्याप फारसा धक्का पोंचलेला नाहीं. या शहरांत केवळ नेवारी लोकांचीच वस्ती आहे. येथील हवापाणी फार उत्तम आहे. येथील राजवाडा व मंदिरें, शहराच्या पश्चिमेस असलेल्या एका पहाडावर बांधलेलीं असून तीं फार प्रेक्षणीय आहेत. कीर्तिपुरांतील महत्त्वाचीं देवालयें म्हटलीं म्हणजे हरगौरी, व्याघ्रभैरव व गणेश हीं होत.


## १४ अर्वाचीन नेपाळ.

पौर्वात्य संस्कृति आणि पाश्चिमात्य लोकांचें कर्तृत्व व दाक्षिण्य, यांच्या मिश्रणाचें गोड फल म्हणजे अर्वाचीन नेपाळ होय. हिंदुस्थानांतील इतर भागाप्रमाणेंच, पाश्चात्य सुधारणेच्या अनिवार लाटेनें नेपाळांतील पौर्वात्य संस्कृति आणि धर्म यांना बिलकुल धक्का पोंचलेला नाहीं. आपल्या चालू स्थितींत योग्य ती सुधारणा व्हावी येवढ्याच पुरती पाश्चात्य सुधारणा हिंदी लोकांनीं ग्रहण केलेली आहे, व या बाबतींत, उभ्या हिंदुस्थानांत नेपाळचें स्थान अद्वितीय आहे.

नेपाळास हल्लींचें स्पृहणीय स्वरूप प्राप्त होण्यास महाराज सरवीर समशेर जंगबहादूर यांचे व त्यांच्या पश्चात त्यांच्या जागीं अधिष्ठित



बीरगंज येथील एक स्त्री.



काटमांडू शहरांतील एक रस्ता.

झालेले राणा सर चंद्र समशेर जंग बहादूर यांचे अविश्रांत परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. नेपाळांतील चालू राज्यकारभार तत्त्वतः जरी अगदीं सुधारलेल्या पद्धतीवर चालला आहे तरी एकमुखी राजसत्ता अद्याप पूर्णपणें नष्ट झालेली नाहीं. नेपाळांत न्यायकोर्टें आहेत, एक हायकोर्टही आहे, कायदेकौन्सिल आहे व प्रिव्हि कौन्सिलही आहे, परंतु शेवटचें अपील मुख्य प्रधानाकडेच होतें. नेपाळ सरकारचीं मुख्य खातीं म्हटलीं म्हणजे लष्कर, जमाबंदी, हिशेबी खातें, जकात, खजिना, पोलीस, टांकसाळ, नोंदणी ( रेजिस्ट्रेशन ), न्यायखातें आणि विद्याखातें हीं असून राजगुरु आणि मैलागुरु यांच्या ताब्यांत सर्व धार्मिक व सामाजिक संस्था देण्यांत आलेल्या आहेत.

नेपाळांत, पाश्चात्य पद्धतीवर राजवाडे बांधण्याचा उपक्रम जंगबहादूर यानीं केला. त्याचा स्वतःचा प्रचंड वाडा विष्णुमती नदीच्या कांठीं थापाथली नामक ठिकाणीं आहे. हा वाडा बांधल्यावर त्याच धर्तीवर महाराज वीर समशेर जंगबहादूर व महाराज सर चंद्रसमशेर जंगबहादूर यांनीं आणखी राजवाडे बांधले. काटमांडू हें दाट लोकवस्तीचें शहर असल्यामुळें हे भव्य राजवाडे अर्थातच शहराबाहेर बांधावे लागले व त्यामुळें शहराचा विस्तार वाढत गेला. तुंडीखेल ( लष्कराच्या परेडीची जागा ) व त्याच्या जवळचा तलाव यांच्या सभोंवार सरकारी इमारती रांगेनें लागलेल्या आहेत व एका कोंपऱ्यांत मुख्य प्रधानाचा वाडा आहे. या इमारतींपैकीं पुढील इमारती प्रेक्षणीय आहेतः—दरबार स्कूल, सरकारी दवाखाना, वीर रुग्णालय, श्रीचंद्र दवाखाना, लष्करी हास्पितळ, फीमेल हास्पिटल, क्लॉक् टॉवर, त्रिभुवन कॉलेज, विद्युत्गृह व 'धरारा' ऊर्फ भीमसेनाचा मनोरा. रात्रौ या सर्व इमारतींतून विजेचे दिवे लावण्यांत आले म्हणजे त्यांची व शेजारच्या राणीपोखरा तलावाची शोभा कांहीं विलक्षण दिसते.

नेपाळ सरकारच्या राज्यकारभाराचीं जीं अनेक खातीं आहेत त्यांपैकीं कांहीं उपयुक्त व लोकोपकारी खात्यांची माहिती येथें देतों. १ पब्लिक् वर्क्स खातें व काटमांडूची म्युनिसीपालिटी यांच्यामार्फत आज कित्येक वर्षें शहरांतील गटारें नवीन पद्धतीनें बांधण्याचें; शहरांतील रस्त्यांची, वाफेच्या रुळाच्या साहाय्यानें दुरुस्ती करण्याचें; रक्षॉल येथून कांटमांडूपर्यंत, मोटारींच्या रहदारीस योग्य असा एक मोठा राजरस्ता तयार करण्याचें; पूल बांधण्याचें व तराईतून नेपाळांत धान्य वगैरे नेण्यासाठीं वाटेंतल्या पहाडांवरून एक आकाशगामी रज्जुमार्ग ( rope airial way ) बांधण्याचें, अशीं कामें सुरू आहेत. कांटमांडू शहरास पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं नळ घालण्याचा पहिला प्रयत्न वीर समशेर जंग यांच्या कारकार्दीत झाला व ती योजना १८९२ सालीं पुरी झाली. त्यानंतर भीमफेडी, भाटगांव, विचाखोरी आणि पाटण या ठिकाणीं पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यांत आली. पाटण येथील पाणीपुरवठ्याची योजना हल्लींच्या महाराजांच्या ज्येष्ठ पत्नीच्या नांवानें करण्यांत आली आहे. या पाणीपुरवठ्याच्या योजनांपैकीं विशेषत्वानें उल्लेख करण्यासारखी योजना म्हटली म्हणजे तराईंतील जंगल ओलांडीत असतां दर दोन मैलांवर आढळणाऱ्या हौदांची होय. हे हौद राजघराण्यांतील एका स्त्रीनें बांधविलेले आहेत.

शहरापासून सात मैलांवर फिरपिंग येथें हल्लींच्या महाराजांनीं पाण्यापासून वीज उत्पन्न करण्याचा कारखाना स्थापन केला असून त्यापासून शहराला विद्युत्छक्तीचा पुरवठा होत असतो व याच विजेच्या साहाय्यानें शहरांतील भव्य रस्त्यांवरील, चौकांतील व नागरिकांच्या घरांतील दिवे लावले जातात. जमिनीच्या सपाटीपासून सुमारें १००० फूट उंचीवर, भूपृष्ठाखालून वाहणाऱ्या दोन झऱ्यांचे प्रवाह एका मोठ्या कृत्रिम जलाशयांत सोडले असून नळांच्या द्वारें त्यांतील पाणी खालच्या ' पॉवर हौस ' मध्यें जातें व त्याच्या वेगानें प्राथमिक विद्युत

उत्पन्न होते. ही विद्युत् एका बलिष्ठ 'डायनामो' मध्यें सोडली असून हा 'डायनामो' ११००० 'व्होल्टेज' च्या शक्तीची वीज तयार करतो. तूर्त या प्रचंड विद्युत्च्छक्तीचा कांहीं उपयोग नसल्यामुळें विजेचा बराच मोठा प्रवाह जमिनींत सोडून द्यावा लागतो !

नेपाळांत टेलिफोनची व्यवस्था असून ती हल्लींच्या महाराजांनीं अंमलांत आणली आहे. काटमांडू शहर व सरहद्दीवरील रक्षॉलजवळचें वीरगंज ठाणें हीं दोन ठिकाणें टेलिफोननें जोडलेलीं असून, नेपाळचा बाहेरील जगाशीं साक्षात् संबंध हा येवढाच आहे. कारण तारेनें बातमी पोंचविण्याची व्यवस्था नेपाळांत नाहीं. शेतीसुधारणेचीं कामेंही सरकारानें हातीं घेतलेलीं असून, ६४ लक्ष रुपये खर्चाचा एक मोठा कालवा तयार करण्याचें काम हल्लीं सुरू आहे. नेपाळांतील भूगर्भ-शास्त्रवेत्ते संस्थानांत खाणींचा शोध लावीत असून कांहीं नवीन खाणी लागल्याचें त्यांनीं जाहीरही केलें आहे. दगडी कोळशाची एक मोठी खाण सांपडली असून तिच्यांतून कोळसा काढण्याचा प्रयत्न चालू आहे.

नेपाळ सरकारच्या सर्व खात्यांत तेथील लष्करी खात्याची तयारी फार उत्तम आहे; हल्लीं ह्या खात्याची पुनर्घटना इंग्रजी लष्करी खात्याच्या धर्तीवर करण्यांत येत असून, त्यांतील अंमलदारही इंग्रजी पलटणींतील अमलदारांप्रमाणेंच नेमलेले आहेत. मेजर सी. जी. ब्रुस यांनीं नेपाळी फौजेचा जुन्या पद्धतीचा पोषाक व तिच्या जुन्या पद्धतीच्या हालचाली यांजवर १९१० सालीं टीका केली होती, परंतु गेल्या महायुद्धानंतर ही स्थिति पूर्णपणें पालटली असून सैनिकांस खाकी रंगाचीं कुडतीं, खाकी कोट व खाकी टोप्या देण्यांत आलेल्या आहेत. सैनिकांचे पगारही वाढविण्यांत आले आहेत व त्यांना निशाण मारण्याचें शिक्षणही नियमितपणें देण्यांत येत आहे. यूरोपांत वाद्नशास्त्राचें शिक्षण संपादन करून आलेले मि. ए. एम.

खान यांच्या हाताखालीं लष्करी बॅन्ड वाजविण्याची कला संपादन केली जात आहे. लष्करी अमलदारांस शिक्षण देण्यासाठीं एक लष्करी शाळाही स्थापन करण्यांत आली आहे.

गुरखे लोकांचें विलक्षण शौर्य आणि कडक शिस्त यांची प्रसिद्धि सर्व जगभर आहे. त्यांचें युद्धकौशल्य आणि वैयक्तिक शौर्य या गुणांमुळें त्यांना सर्वत्र मोठा मान मिळतो. अत्यंत आवश्यक असलेलें पाश्चात्य लष्करी शिक्षण त्यांना मिळालें व अगदीं नवीन तऱ्हेचीं विध्वंसक शस्त्रास्त्रें त्यांच्या हातीं देण्यांत आलीं तर सर्व जगांतील उत्तम सैन्यांत त्यांची गणना होईल. लष्करी खात्यांतील मोठे अंमलदार म्हटले म्हणजे कमांडर-इन-चीफ सर भीम समशेर, जनरल युद्धसमशेर, सर मोहन समशेर, व भैरव समशेर हे होत.

नेपाळच्या हल्लींच्या लष्करी सामर्थ्याची कल्पना करणें कठीण आहे. १९०८ सालीं नेपाळी फौजेचा अंदाजी आंकडा प्रसिद्ध करण्यांत आला होता, त्यांत तोफखान्यावरील गोलंदाजांसुद्धां एकंदर ४५००० सैनिक नेपाळापाशीं आहेत असें म्हटलें होतें. परंतु याशिवाय "रेग्युलर इन्फन्ट्री', 'मिलिशिया,' व बरीच मोठी 'रिझर्व्ह' अशी आणखी बरीच फौज नेपाळांत आहे. परंतु हा अंदाज अगदीं ढोबळ असून, बाह्यतः दिसतें किंवा दाखविण्यांत येतें त्याहून नेपाळचें लष्करी सामर्थ्य पुष्कळच मोठें असण्याचा संभव आहे.

तुंडीखेल येथील लष्करी कवाइतीचें मैदान हें पौवार्त्य देशांतील कोणत्याही सर्वोत्कृष्ट कवाइतीच्या मैदानाच्या तोडीचें आहे. कमींत कमी बारा पलटणी आणि डोंगरी तोफांच्या सहा बॅटऱ्या, इतक्या फौजेला येथें एकदम कवाईत करितां येईल, येवढें हें मैदान विस्तीर्ण आहे.

गेल्या यूरोपीयन महायुद्धांत सर्व नेपाळी सैन्य हिंदुस्थानच्या संरक्षणार्थ ब्रिटिश सरकारच्या दिमतीस देण्यांत आलें होतें व या

सैन्यानें आफ्रिडी लोकांबरोबर लढाई करून त्याना पराभूत केलें. या मदतीच्या मोबदल्यादाखल हिंदुस्थान सरकारकडून नेपाळ सरकारास प्रतिवर्षी १० लक्ष रुपयांची रकम देण्यांत येते.

नेपाळचे मुख्य प्रधान महाराज सर चंद्र समशेरजंग यांनीं अगदीं अलीकडे ज्या सुधारणा घडवून आणिल्या आहेत त्यांत, कैदी लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं त्यांनीं केलेला प्रयत्न अवश्य उल्लेखनीय आहे. एक मोठी दुमजली इमारत व तिला जोडून एक मोठें वर्कशॉप बांधण्यांत आलें असून त्यांत कैदी लोकांस निरनिराळ्या कलांचें शिक्षण देण्यांत येतें. शिवाय, यूरोपांतील तुरुंगाविषयींच्या अगदीं नवीन नियमांच्या धर्तीवर नेपाळांतील तुरुंगांच्या कायद्यांत सुधारणा करण्यांत आली आहे. दुसरी अत्यंत महत्त्वाची सुधारणा म्हटली म्हणजे गुलामगिरीचा नायनाट ही होय. खंडणी भरून मुक्त केलेल्या गुलामांच्या चरितार्थासाठीं दिवाणसाहेबांनीं मोठमोठ्या रकमा मंजूर केल्या आहेत, त्यांच्या उन्नतीसाठीं नवीन कायदे केले आहेत व गुलामांच्या सर्व मालकांस व जनतेस ही गुलामगिरीची दुष्ट चाल नष्ट करण्याची विनंति केली आहे. प्रधानजींनीं आणखी दीनगृहें (Poor houses), अनाथ बालगृहें, व महारोगी-गृहें बांधलीं असून अनेक दुष्ट सामाजिक चाली बंद केल्या आहेत.

नेपाळचे विद्यमान मुख्य प्रधान सर चंद्रसमशेरजंग बहादूर यांचें व्यक्तिमाहात्म्य मोठें असून, प्रजाजनांच्या कल्याणाची खरी कळकळ त्यांच्या अंतःकरणांत वसत आहे. चाणक्य ऊर्फ कौटिल्य या नांवाचा जो प्रसिद्ध मुत्सद्दी प्राचीन काळीं आपल्या देशांत होऊन गेला त्या नमुन्याचे हे मुत्सद्दी असून, चातुर्य, कार्यक्षमता, दूरदर्शित्व आणि धूर्तता या आपल्या गुणांच्या जोरावर नेपाळचा दर्जा त्यांनीं वाढविला आहे व एका काळीं जें नेपाळ एक सामान्य देशी संस्थान होतें तें

आज त्यांनीं एक स्वतंत्र राज्य बनविलें आहे. या प्रधानजींच्या मुत्सद्देगिरीमुळें नेपाळच्या महाराजाधिराजांस ‘ हिज् मॅजेस्टी ’ ( His Majesty ) ही पूर्ण स्वातंत्र्यनिदर्शक पदवी धारण करण्याचा अधिकार व ३१ तोफांचा मान मिळालेला आहे; व नेपाळांतील ‘ ब्रिटिश रेसिडेंटा ’ ची जागा रद्द करण्यांत आली असून, त्याच्या ऐवजीं नुसता एक वकील नेमण्यांत आला आहे. जगांतल्या वाटेल त्या देशांतून शस्त्रास्त्रें व दारूगोळा अनिर्बंध रीतीनें आणण्याचा अधिकार नेपाळास आतां मिळालेला आहे, आयात मालावरची जकात उठविण्यांत आलेली आहे व वाटेल त्या प्रकारचें परराष्ट्रीय राजकारण करण्याची पूर्ण मुभा नेपाळ सरकारास आतां मिळालेली आहे.

# माझा नेपाळांतील अनुभव

जटेश्वरं समारभ्य योगेशान्तं महेश्वरी ।
नैपाल देशो देवेशि साधकानां सुसिद्धिदः ॥
—शक्तिसंगम तंत्र ।

ईश्वरकृपेनें आमच्या आयुष्यांत आम्हांला जगांतील अनेक देशांचा प्रवास घडला आहे. युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, आफ्रिका, आस्ट्रेलिया, न्यू झीलंड, तासमानिया, चीन, जपान, सीलोन, सोमाली लॅन्ड, युगान्डा, अबिसिनिया, ब्रह्मदेश वगैरे भूभागांतील देशस्थिति आम्ही स्वनेत्रांनीं अवलोकन केली आहे. आमच्या भरतखंडांतीलही बहुतेक महत्वाचीं व प्रेक्षणीय ठिकाणें आम्ही पाहिलीं आहेत. परंतु हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या सुप्रसिद्ध स्वतंत्र हिंदू संस्थानांत प्रवास करण्याचा योग आजपर्यंत आला नव्हता, तो गेल्या १९२५ सालीं आला; व त्या वेळीं त्या स्वतंत्र राज्याच्या अधिपतींचीही समक्ष भेट झाली. त्या संबंधाची थोडीशी मनोरंजक हकीकत प्रस्तुत प्रकरणांत निवेदन करण्याचा विचार आहे.

सन १९२५ सालची गोष्ट. तारीख १२ फेब्रुवारी रोजीं पहांटे एक वाजतां आम्ही बडोद्याहून बी. बी. सी. आय. रेल्वेच्या पेशावर मेलनें निघालों व मथुरा, कानपुर, गोरखपुर, मुजफ्फरपुर, सोनपुर वगैरे शहरांवरून बेटिया गांवीं तारीख १६ फेब्रुवारी रोजीं पहांटे ३ वाजतां जाऊन पोहोंचलों. तेथें आम्ही एक दिवस मुक्काम केला. या मुक्कामांत असें समजलें कीं, महाशिवरात्रीचा दिवस अगदीं जवळ आलेला असून, आम्ही जर लवकर निघालों तर महाशिवरात्रीस नेपाळांतील श्रीपशुपतिनाथाचें दर्शन आम्हास घेतां येईल. तारीख १७ फेब्रुवारी रोजीं

सकाळीं ८ वाजतां आम्ही बेटिया येथून निघालों व सुमारें दीड तासांत रुक्साळ येथें जाऊन पोहोंचलों. हें स्टेशन बंगाल नॉर्थ वेस्टर्न रेल्वेवर आहे. रुक्साळपासून एक मैलाच्या आंत बीरगंज नामक ठिकाण आहे. तेथपासून नेपाळची सरहद्द सुरू होते. रुक्साळाहून बीरगंजला-आम्ही टांग्यांतून गेलों. वाटेंत एक लहानसा पूल लागतो. त्याच्या अलीकडे इंग्रज सरकारची सरहद्द संपते, व पलीकडे नेपाळ सरकारची सरहद्द लागते. बडोद्याच्या राजघराण्याशीं आमचा संबंध आहे हें कोणाच्या लक्ष्यांत येऊं नये म्हणून आम्ही इंग्रजी पद्धतीचा पोशाक केला होता व प्रवासाचा बेतही साधाच ठेविला होता. कारण नेपाळ सरकारची अशी चाल आहे कीं, त्यांच्या राज्यांत जर कोणी बाहेरचा मोठा मनुष्य गेला तर ती बातमी टेलिफोननें काटमांडू येथें कळविली जाते व मग संस्थानचा पाहुणा म्हणून संस्थानच्या खर्चानें त्या मनुष्याची, आगाऊ कळविलें असल्यास, सरबराई ठेविली जाते.

बीरगंज येथें डॉक्टरची तपासणी होते व पास देण्यांत येतो. आमची तपासणी होऊन पास मिळण्यास फारसा वेळ लागला नाहीं. परंतु बेटिया येथें आम्ही बरोबर घेतलेल्या दोन माणसांपैकीं कालेसिंग हा नेपाळचा प्रजाजन असल्यामुळें त्याची तपासणी होऊन पास मिळण्यास बराच वेळ लागला. वैद्यकीय तपासणीपेक्षां इकडचे तिकडचे अनेक प्रश्न विचारून चौकशी करण्यांत व त्याला इकडून तिकडे फिरविण्यांतच अधिकाऱ्यांनीं फार वेळ घालविला. शेवटीं आम्हा सर्वांस पास मिळाल्यावर बीरगंज येथून आम्ही खटोला डोलींत बसून निघालों व संध्याकाळीं ६ वाजतां पखानीपुर नामक गांवीं मुक्काम केला. हें गांव बीरगंजपासून ४ मैल आहे. रात्रौ त्याच ठिकाणीं आम्ही भोजन केलें व निजलों.

दुसरे दिवशीं बुधवार तारीख १८ फेब्रुवारी रोजीं पहांटे ५ वाजतां पखानीपुर येथून आम्ही निघालों व दुपारीं साडेतीन वाजतां भिक्षा-

खोरी नामक गांवीं येऊन पोहोंचलों. तेथें सरकारी विश्रांतिगृहांत ( Rest House ) ऊन पाण्यानें स्नान केलें. ही इमारत एक मजली असून तींत एक स्वयंपाकाची खोली आहे, व नोकर लोकांसाठीं जवळच जागेची सोय केली आहे. या रस्त्यावर नेपाळ सरकारानें दोन दोन मैलांवर यात्रेकरूंच्या सोईसाठीं नळाच्या पाण्याचे हौद बांधून ठेविले आहेत. त्यांतला शेवटला चौथा हौद आम्हास या ठिकाणीं लागला. पुष्कळ यात्रेकरूंनीं रात्रौ येथें निद्रा केली. हें गांव बरेंच मोठें असून तेथें एक नदी आहे व तींत पाणीही पुष्कळ होतें. येथें नेपाळी लष्कराची छावणी आहे. कोणीही मोठा मनुष्य आला तर त्याच्या उतरण्याची सर्व व्यवस्था येथें आहे. शिकारीच्या कामीं उपयोगी पडणारे हत्ती वगैरे मोठा लवाजमा येथें दिसला. गांवांतील बाजारही मोठा आहे. येथें चतरजी या नांवाचा एक अंडरग्रॅज्युएट बंगाली विद्यार्थी आम्हास भेटला. तो नोकरीच्या शोधार्थ नेपाळांत चालला होता. त्यानें आमच्याबरोबर प्रवास करण्याची आपली इच्छा व्यक्त केली. एका लहानशा गांठोड्याशिवाय त्याजपाशीं दुसरें कांहीं सामान नव्हतें. आमच्याबरोबरच्या लोकांनीं आमचें नाव गांव समजून घेण्याची इच्छा दर्शविली तेव्हां, काटमांडूहून परत आल्यावर आमचें नांव गांव तुम्हांस सांगूं असें आम्ही त्यांस सांगितलें. रात्रौ तेथेंच जेवण करून आम्ही निजलों व दुसरे दिवशीं तारीख १९ फेब्रुवारी रोजीं पहांटे साडेपांच वाजतां निघून संध्याकाळीं ७ वाजतां मैसेदोबान नामक ठिकाणीं येऊन पोहोंचलों. रात्रौ येथें राहून दुसरे दिवशीं पहांटे साडेपांच वाजतां निघून भीमफेडी नामक गांवीं सकाळीं ८ वाजतां येऊन पोहोंचलों. या ठिकाणापर्यंत तांगे आणि घोडे बीरगंजहून येऊं शकतात. या गांवीं अनेक तंबू ठोकून एक मोठा क्यांप उभारला होता. पहाऱ्यावर नुसते लष्करी शिपाईच ६०० होते. नेपा-

ळचे महाराजाधिराज श्रीत्रिभुवनबीर विक्रमशहा हे या वेळीं या कँपांत होते. त्यांचे बरोबर त्यांची माता, सावत्र माता, व मुख्य प्रधान व सेनापति महाराज मेजर जनरल सर चंद्र समशेर जंग बहादुर राणा, इत्यादि परिवार होता. मी चटरजीकडे आमचे नांवाचें कार्ड देऊन, मुख्य प्रधानाची भेट घेतां येईल कीं काय याची चौकशी करण्यास पाठविलें. थोड्या वेळानें मला बोलावणें आल्यावरून मी गेलों. तेथील एका अधिकाऱ्यानें मला सांगितलें कीं महाराज साहेब व राजघराण्यांतील मंडळी काटमांडूस जाण्याच्या तयारींत आहेत व त्यामुळें गडबड आहे. तथापि तुमची कार्ड मी आंत घेऊन जातों, तोंपर्यंत तुम्ही येथेंच बसा. त्याप्रमाणें त्यानें आंत जाऊन आमची कार्ड मुख्य प्रधानास दाखविली. तेव्हां त्यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी मजकडे आला व त्यानें बडोद्याच्या पुष्कळ गोष्टी विचारल्या. प्रधानजींच्या भेटीविषयीं तो म्हणाला, महाराजाधिराज-साहेब निघण्याच्या तयारींत आहेत. आणखी सुमारें एक तासानें स्वाऱ्या निघतील. कांहीं दिवसांपूर्वी महाराजाधिराजांच्या मातोश्री द्वारकेच्या यात्रेस गेल्या होत्या त्याही त्याच वेळीं भीमफेडी येथें आल्या होत्या. प्रधानजीच्या सेक्रेटरीस मी सांगितलें कीं, खुद्द महाराजाधिराज साहेबांशीं भाषणाचा योग आला नाहीं तरी निदान त्यांना एकदा पहावें अशी माझी इच्छा आहे, तरी तेवढी व्यवस्था कराल तर बरें होईल. हें ऐकून सेक्रेटरी परत गेला व कांहीं वेळानें प्रधानजींचे एक चिरंजीव मजकडे आले. त्यांच्या डोक्यावर नोकरांनीं लांब दांड्याचें छत्र धरलें होतें. महाराजाधिराजांच्या मातोश्री द्वारकेच्या यात्रेस गेल्या होत्या, त्यांच्या स्वारींत हा प्रधानपुत्र होता. गायकवाड सरकारच्या अधिकाऱ्यांनीं द्वारका येथें आपली व्यवस्था फार चांगली ठेविली होती असें त्यांनीं सांगितलें. मला महाराजाधिराज साहेबांची भेट घेण्याची इच्छा असल्याचें मी त्यांस कळविलें. ते गेल्यावर त्यांचे वडील बंधु जनरल सर मोहोन

के.सी.आय. ई. हे आले व त्यांनीं मला महाराजाधिराजांच्या भेटीसाठीं त्यांच्या तंबूत नेलें. एका कनातींतून निघाल्यावर दुसऱ्या कनातीच्या आंत एका लहान तंबूंत युरोपियन पद्धतीची हॅट घालून प्रधानजी एका खुर्चीवर बसले होते व जवळच उजव्या बाजूस महाराजाधिराज साहेब इंग्रजी तऱ्हेचा पोशाक करून एका खुर्चीवर बसलें होते. त्यांचें वय १९–२० वर्षांचें असावें. चर्या रजपुती थाटाची दिसली. ते रूपानें फार सुंदर असून, त्यांची उंची पांच फुटांहून थोडी अधिक असेल. वर्ण गोरा असून शरीरप्रकृती पूर्ण निरोगी दिसली. एका हातांत हात-मोजा घातला होता व दुसऱ्या हातांत घालीत होते. प्रधानजी उतार-वयाचे असून ते अदमासें साठ वर्षांहून अधिक वयाचे असावेत. त्यांचा वर्ण निमगोरा असून ते अंगानें सडपातळच आहेत. त्यांनीं बरीच लांब दाढी राखिली आहे. त्यांना पाहतांक्षणींच मला महर्षि दादाभाई नौरोजी यांचें स्मरण झालें. नुसत्या बहिरंगापुरतेंच केवळ त्यांच्यांत व दादाभाईंत सादृश्य नसून दादाभाईंचे गुणही त्यांचे ठिकाणीं वसत असल्याची मला थोड्या वेळांत साक्ष पटली. कारण मुख्य प्रधानाचे अंगीं दादाभाईंची अलौकिक बुद्धिमत्ता, मुत्सद्दीपणा, हुशारी, स्वदेशप्रेम, स्वाभिमान, विनयपूर्ण विद्वत्ता वगैरे अनेक गुण असल्याबद्दलचा मला अनुभव आला. या सर्व मंडळीस इंग्रजी चांगलें बोलतां येतें. खुद्द महाराजाधिराज जरी कांहीं बोलले नाहींत तरी आमचें इंग्रजी भाषण ते लक्ष्यपूर्वक ऐकत होते. असो. मी तंबूंत प्रवेश करितांच दिवाणजींनीं दोन पावलें पुढें येऊन माझें स्वागत केलें. सहज संभाषणाच्या ओघांत प्रधानजींस मी असें सांगितलें कीं पूर्वी एकदां बडोदें येथील रेसिडेंट मार्फत आम्ही आमच्या एका शास्त्र्यास जुने हस्तलिखित ग्रंथ वगैरे मिळविण्यासाठीं नेपाळांत पाठविलें होतें. परंतु नेपाळ सरकारानें परवानगी दिली नाहीं, म्हणून ते शास्त्री खाजगी

रीतीनें यात्रेकरूप्रमाणें नेपाळांत जाऊन पोथ्या घेऊन आले. मीही रेसिडेन्ट मार्फत आलों तर मलाही कदाचित् नेपाळांत प्रवेश मिळणार नाहीं, या भीतीनें साध्या यात्रेकरूप्रमाणेंच येण्याचें मी ठरविलें. असो. नंतर प्रधानजींनीं महाराजाधिराजांशीं माझी ओळख करून दिली, तेव्हां महाराजाधिराज उठून उभे राहिले व माझ्याशीं हस्तांदोलन करून मी बसल्यावर आपण बसले. नेपाळांत मला कोठें जावयाचें आहे त्याची त्यांनीं चौकशी केली. तेव्हां मीं सांगितलें कीं, आमच्या रयतेपैकीं एक मनुष्य आपल्या राजधानींत नोकर आहे व जमल्यास त्याजकडे उतरण्याचा माझा विचार आहे. त्यांनीं विस्मयानें विचारलें, " हा मनुष्य कोण ? " मी सांगितलें, " अल्लाउद्दीन मौलाबक्ष पठाण, बँड मास्तर. " हा पूर्वीं वडोद्यास असतांना श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं त्याला विलायतेस पाठविलें होतें व तेथून तो डाक्टर ऑफ म्युझिकची पदवी मिळवून आला होता. त्याचे वडील प्रो. मौलाबक्ष व त्याचा भाऊ हे मरेपर्यंत बडोदें येथें कलावंत खात्यांत नोकर होते. श्रीमंत सयाजीराव महाराजांना युरोपियन ब्यांडमास्तर ठेवावयाचा होता ह्मणून अल्लाउद्दीन हा बडोदें येथील नोकरी सोडून नेपाळ सरकारच्या आश्रयास जाऊन राहिला होता.

प्रधानजींशीं झालेल्या भाषणांत, जगांतील निरनिराळया देशांत मी जो प्रवास केला होता त्याची संक्षिप्त हकीकत त्यांस मी पूर्वीं सांगितली होती. ती त्यांच्या लक्ष्यांत असल्यामुळें त्यानीं मला विचारलें, " तुम्ही अल्लाउद्दीनकडे रहाणार कीं काय? " मी सांगितलें, " त्याचा वडील भाऊ नुकताच वारला असल्यामुळें हल्लीं तो बडोद्यास गेला आहे." यावर प्रधानजी म्हणाले, " तुम्ही जगभर प्रवास केलेला असल्यामुळें सोंवळ्या ओवळ्याचा विधिनिषेध तुम्हास फारसा नसेल." मी ह्मटलें, " मी फारसें सोंवळें पाळींत नाहीं व मुसलमानाकडे उतरण्यास मला

कांहीं हरकत वाटत नाहीं." हें ऐकून ते म्हणाले, "मी महाराजाधिराजांच्या नांवानें (in the name of His Majesty) आपणास अशी विनंति करितों कीं आपण काठमांडू येथें गेल्यावर पशुपतिनाथाच्या मंदिरांत दर्शनास जाल तेव्हां मूर्तीस स्पर्श करून पूजा वगैरे करूं नये." मी हें कबूल केलें. नंतर मी प्रधानजींस म्हटलें, "मला शिकारीचा फार नाद आहे. आपल्या जंगलांत मोठ्या जनावरांच्या शिकारीची व्यवस्था झाल्यास बरें होईल." पण यावर त्यांनीं फारसें अनुकूल उत्तर दिलें नाहीं; मागाहून पाहूं असें म्हणाले. नंतर त्यांनीं मला विचारलें, "आपल्याला कशाची जरूर आहे काय?" मी म्हटलें "नाहीं." तेव्हां ते आपल्या वडील चिरंजीवांकडे पाहून म्हणाले, "हे आमचे चिरंजीव आपली सर्व व्यवस्था लावतील." इतकें झाल्यावर त्या उभयतांचा निरोप घेऊन मी निघालों. प्रधानजींचे वडील चिरंजीव आमच्याबरोबर बाहेर आले. मी त्यांना सांगितलें कीं "उद्यां महाशिवरात्र आहे, तरी पशुपतिनाथाच्या दर्शनाची वेळ टळतां नये. म्हणून त्यापूर्वी राजधानींत पोहोंचण्याची तजवीज करावी." ते म्हणाले "ज्या वाहनांतून आपण येथपर्यंत प्रवास केला तें कांहीं वेळेवर राजधानीस जाऊन पोहोंचणार नाहीं, म्हणून मी दुसरें वाहन पाठवितों. जवळच सरकारी पाठशाळा आहे तेथें आपली उतरण्याची व्यवस्था करूं." नंतर आमचे जेवणाची चौकशी त्यांनीं केली. तेव्हां मी सांगितलें कीं आपल्या स्वतःच्या मुदबकखान्यांतलें जेवण आम्हास चालेल. तेव्हां "ठीक आहे" असें ते म्हणाले. व यापुढें सरकारी पाहुणे या नात्यानें आपली सरबराई ठेविली जाईल असें त्यांनीं मला सांगितलें. महाराजाधिराजांची स्वारी जावयाची होती ती पहाण्यासाठीं ए. डी. सी. बरोबर मी एका बाजूस उभा राहिलों. कांहीं वेळानें महाराजाधिराजांची आई कनातीच्या बाहेर येऊन तावदा-

नांत बसली व खुद्द महाराजाधिराज साहेबांनीं जवळच रुमालासारखा कपडा होता तो त्यांच्या पायांवर टाकला. नंतर ते आपल्या स्वतःच्या वाहनांत बसावयास गेले. त्यानंतर दिवाणसाहेब व महाराजाधिराजांची सापत्न माता हीं कनातीच्या बाहेर आलीं व माताजी आपल्या वाहनांत बसल्यावर तीन्ही स्वाऱ्या आम्ही उभे होतों त्या ठिकाणाहून गेल्या. नेपाळच्या राजघराण्यांत गोषाची किंवा पडद्याची चाल नाहीं; परंतु प्रजाजनांत व सरदारवर्गांत गोशा पाळतात. महाराजाधिराज, त्यांची माता, व सावत्र माता यांच्या स्वाऱ्या निघून गेल्यावर त्यांच्या मागून त्यांच्या परिवारांतील स्त्रियांच्या स्वाऱ्या मोठ्या थाटानें निघाल्या. एकेका वाहनाबरोबर चांगले कपडे घातलेल्या पांच सहा लष्करी लोकांची तुकडी चालत होती. ह्या स्त्रिया बहुतेक दासी वगैरे असून त्या नेपाळी होत्या. त्यांची रूपरेखा मंगोलियन पद्धतीची होती. प्रधान-पुत्रानें काटमांडूस टेलिफोन करून तेथें आमच्या उतरण्याची सर्व व्यवस्था आगाऊच करून ठेविली होती.

नंतर आम्ही ए. डी. सी. बरोबर जवळच्या पाठशाळेंत गेलों. प्रधानजींचा मुक्काम आणखी दोन चार दिवस तेथेंच व्हावयाचा होता. पाठशाळेंत गेल्यावर स्मश्रु करविण्यासाठीं एखादा न्हावी पहाण्यास सांगितलें. ते आपल्या आश्रित न्हाव्यांपैकीं एखाद्यास पाठवितील असें आम्हास वाटलें होतें. परंतु त्यांनीं त्याच गांवांतला एक न्हावी पाठविला व तो स्मश्रुकर्मांत इतका अकुशल होता कीं तशा प्रकारचें स्मश्रु-कर्म करून घेण्याचा प्रसंग मला आजन्मांत कधीं आला नव्हता. नंतर स्नान व भोजन झाल्यावर, ए. डी. सी. नें आणलेल्या चौपान नामक वाहनांत बसून मी काठमांडूस जाण्यास निघालों. हें वाहन चांगलें प्रशस्त व सोइस्कर होतें व तें आळीपाळीनें उचलण्यास सुमारें १०-१२ लोक दिले होते. त्या सर्वांवर एक अमलदार होता. भीमफेडीपासून राज-धानी १० मैलांच्या आंत आहे. परंतु सगळा प्रवास डोंगराळ प्रदेशांतून

करावा लागतो. खरें म्हटलें तर त्याच दिवशीं रात्रीं आम्ही काठमाडूस पोहोंचलों पाहिजे होतों व तसे आम्ही पोंहोंचणार या समजुतीनें काठमांडूच्या उपनगरांत आमच्यासाठीं एक मोटार तयार ठेवण्यांत आली होती, परंतु वाटेंत वाहन थोडेंसें नादुरुस्त झाल्यामुळें ता. २० शुक्रवार रोजीं शनिवारीं लवकरच पहांटे निघून सकाळीं ७ वाजतां आम्ही काठमांडूनजीकच्या डोंगराच्या पायथ्याशीं जाऊन दाखल झालों. मोटार तयारच होती. शिवाय सामानासाठीं एक मोटार पाठविण्यांत आली होती. मोटारींत बसून निघाल्यावर सुमारें दीड दोन तासांनीं राजधानींतील आमच्या मुक्कामाच्या ठिकाणीं आम्ही जाऊन पोहोंचलों. ती जागा म्हणजे एक धर्मशाळा होती. इमारत दुमजली पण फार मोठी होती. वरील मजल्यांवरील तीन खोल्या आमच्या तैनातीस दिल्या होत्या. एका खोलींत पलंग वगैरे निजण्याची सोय असून बैठकीसाठीं जमिनीवरील बिछायतीवर गादी घातलेली होती. दुसऱ्या खोलींत स्वयंपाकाची व्यवस्था असून तिसरी खोली नोकर-लोकांसाठीं व सामानासाठीं दिली होती. फरनिचर वगैरे नव्हतें. फक्त एक खुर्ची मात्र होती. स्नानाची सोय तळमजल्यावर होती. नेपाळ सरकारचे एक अमलदार आमच्याकडे येऊन म्हणाले, "आपण काल रात्रींच येथें येऊन पोहोंचावयाचे. आम्ही गेल्या रात्रीं बारा वाजेपर्यंत आपली वाट पाहिली. आतां जरूरीप्रमाणें जें काय आपणास पाहिजे असेल तें कळवावें म्हणजे त्याप्रमाणें सर्व व्यवस्था होईल." नंतर एक ब्राह्मण सैंपाकी आमच्या स्वयंपाकासाठीं सर्व सामानासह पाठविण्यांत आला. मुदबकखान्यांतून जेवण पाठवावें कीं येथेंच स्वयंपाकाची व्यवस्था करावी याविषयीं पूर्वी आम्हास विचारण्यांत आलें होतें. तेव्हां इकडेच व्यवस्था करण्याविषयीं मी त्यांस सांगितलें होतें. एक लष्करी शिपाई व एक हवालदार असे दोन मनुष्य आमच्या तैनातीस दिले होते. या दोघांपैकीं एक तेथें नेहमीं हजर असे.

आम्हास एखाद्या वस्तूची जरूरी लागल्यास ती पुरविण्यास व आमच्या-बरोबर हिंडण्याफिरण्यास हे शिपाई दिले होते. यांपैकीं एका शिपा-यास, आम्हास मांस वगैरे चालतें व त्याची जरूरी आहे, असें आमच्याबरोबरच्या एका मनुष्यानें सांगितलें तेव्हां तो राजवाड्यांत गेला व परत येऊन सांगूं लागला कीं आज महाशिवरात्र असल्यामुळें मुदबकखान्यांत मांस आणलेलें नाहीं. परंतु आपणास जरूरीच असल्यास मांसाची तजवीज करितां येईल. व त्याप्रमाणें थोड्या वेळानें एक बोकड व एक गिनी फाऊल असे दोन प्राणी आमच्याकडे पाठविण्यांत आले. तो प्रकार पाहून मी राजदूतास सांगितलें कीं, " आज महाशिवरात्र असल्यामुळें आम्हीही मांसग्रहण करीत नाहीं. नोकराच्या गैरसमजामुळें ही गोष्ट घडली. " आम्ही असें सांगितल्यावर त्या प्राण्यांस ते घेऊन गेले. तथापि यावरून एक गोष्ट आमच्या निदर्शनास आली ती ही कीं नेपाळचें राजघराणें व अधिकारी जरी पुराणमतवादी आहेत तरी पाहुण्याच्या पाहुणचारांत कांहीं उणेपणा येऊं नये याविषयीं ते अत्यंत दक्षता बाळगितात. असो.

त्याच दिवशीं संध्याकाळीं पांच वाजण्याच्या सुमारास आम्हास सैन्याची परेड पहाण्याचें अमंत्रण आलें. परेडीची जागा फार विस्तीर्ण आहे. त्या वेळीं सुमारें पांच सहा हजार सैनिक कवाइतीसाठीं तेथें आले होते. मुख्य प्रधानाचा धाकटा भाऊ भीम समसेर,वय सुमारें ४५-५०, हा सैन्याचा कमांडर-इन-चीफ असून त्यानें घोड्यावरून सैन्याची पाहणी केली. त्यांस १७ तोफांची सलामी झाली. कांहीं वेळानें महाराजाधिराजसाहेब एका मोटारींतून परेड ग्राउंडवर आले. तेव्हां त्यांना २१ तोफांची सलामी झाली. कांहीं वेळ सैन्याची पाहणी करून ते पशुपतिनाथाच्या दर्शनास गेले. सैन्यांतला जनरल व कर्नलचा एस्कॉर्ट हे त्यांचे शरीररक्षक म्हणून त्यांजबरोबर गेले. त्यानंतर

थोड्या वेळानें आम्हीही देवळांत गेलों. महाराजाधिराज देवळांत गेल्यावर त्यानीं आपले कपडे बदलले व राजघराण्यांतील मंडळींसह पशुपतिनाथाची पूजा केली. आमची मोटार एका बाजूस उभी होती. महाराजाधिराजांची स्वारी गेल्यावर पोलिसांनीं आम्हाला गर्दीतून वाट काढून देऊन दर्शनाची व्यवस्था केली. देवाचें दर्शन घेऊन आम्ही परत आलों.

काटमांडू येथें आमचा मुक्काम आठ दिवस होता. ता. २१ रोजीं आम्ही तेथें पोंहोंचलों व ता. २८ रोजीं तेथून निघालों. मध्यंतरीं एके दिवशीं मुख्य सेनापतीकडून एक मनुष्य आमच्याकडे आला व आम्ही कधीं जाणार वगैरे चौकशी त्यानें केली. "प्रधानजी काटमांडू येथें कधीं येणार ?" असें आम्ही त्यास विचारलें. दोन तीन दिवसांनीं येतील असें त्यानें सांगितलें. तेव्हां आम्ही त्यास सांगितलें कीं, "प्रधानजींची स्वारी आल्यावर त्यांची भेट घेऊन, पाहुणचाराबद्दल त्यांचे आभार मानून व त्यांचा निरोप घेऊन मग जाण्याचा आमचा विचार आहे.' प्रधानजी येण्याच्या पूर्वीं मुख्य सेनापतींच्या भेटीस मी त्यांच्या घरीं गेलों होतों व त्यांनीं माझा चांगला आदरसत्कार केला. पुढें प्रधानजी आल्यावर तारीख २६ रोजीं गुरुवारीं चार वाजतां मी त्यांच्या भेटीस मोटारींतून त्यांच्या मुक्कामावर गेलों. मोटारींतून उतरतांच त्यांचा सेक्रेटरी भेटला. त्यानें आमचें स्वागत केलें. प्रधानजी वरच्या मजल्यावर होते तेथें सेक्रेटरीनें मला नेलें. एका मोठ्या कोचावर प्रधानजी बसले होते. त्यांचे बंधु कमांडर-इन-चीफ लांब एका खुर्चीवर बसले होते. जवळच डाव्या बाजूस प्रधानजींचा वडील मुलगा जनरल सर मोहोन के. सी. आय. ई. एका खुर्चीवर बसला होता. मी आंत गेल्यावर प्रधानजींनीं मला उत्थापन देऊन हस्तांदोलन केलें. नंतर त्यांच्यापासून कांहीं अंतरावर समोरच एक खुर्ची ठेविली होती तिजवर मी बसलों. पांच सहा मिनिटांत त्यांचा

निरोप घेऊन निघण्याच्या विचारानें मी गेलों होतों व त्यांच अनुरोधानें मी भाषणास सुरुवात केली. परंतु त्यांनीं एखाद्या वकिलाप्रमाणें बडोद्याच्या राज्यकारभाराविषयीं बारकाईनें इतके प्रश्न विचारले कीं ते ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें. त्यांचें माझें संभाषण सुमारें दोन तास झालें. कै. महाराणी जमूनाबाईसाहेब गायकवाड यांनीं श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांस दत्तक घेण्यापूर्वी जो प्रश्न त्यांस विचारला होता, तेथपासून सुरवात करून हल्लींच्या कारकीर्दीविषयीं, राज्यकारभाराविषयीं, कौन्सिलविषयीं, श्रीमंत सयाजीराव महाराज युरोपांत असतांना राज्यकारभार कसा चालतो, वगैरे अनेक प्रश्न त्यांनीं मला विचारले, व त्या सर्वांचीं समर्पक उत्तरें मी त्यांस दिलीं. त्यांच्या प्रश्नावरून बडोद्याची व म्हैसूरची बरीच माहिती त्यांस होती असें माझ्या निदर्शनास आलें. मी आश्चर्यानें त्यांस विचारलें, " बडोद्याची इतकी माहिती आपणास कशी झाली ? " ते म्हणाले " निरनिराळ्या संस्थानांच्या ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्टावरून मी माहिती मिळवितों. " बडोद्यांतील नोकर लोकांचे पगार फार मोठे आहेत असें ते म्हणाले. त्यांचें माझें जें भाषण झालें त्याचा गोषवारा निघण्यापूर्वी लिहून देण्यास त्यांनीं मला सांगितलें. मी सांगितलें कीं, " ही सर्व माहिती एका पुस्तकांत आहे व मी बडोद्यास गेल्यावर तें पुस्तक आपणास पाठवून देईन. " पुढें बडोद्यास आल्यावर त्या पुस्तकाची एक प्रत मी त्यांस स्मरणपूर्वक पाठविली. प्रधानजींनीं मला एक सोन्याचे मुठीची कुकडी, एक चवरी व कस्तुरी दिली. परत याल तेव्हां शिकारीची तजवीज करूं, असेंही आश्वासन त्यांनीं दिलें. पांच सहा हत्ती, तंबू व शिकारीचीं माणसें तुमच्या स्वाधीन करूं असें ते म्हणाले. मी त्यांजपाशीं फोटो मागितले तेव्हां चांगले फोटो शिल्लक नाहींत, ते तयार झाल्यावर देऊं, असें त्यांनीं सांगितलें. त्याचप्रमाणें मी त्यांचेजवळ नेपाळच्या अडमिनिस्ट्रेशन रिपोर्टाची एक प्रत मागितली. परंतु तीं

नेपाळी भाषेंत छापली असून आपणास त्याचा बोध होणार नाहीं असें त्यांनीं मला सांगितलें. सेनापतीजवळ त्यांच्या फोटोची मागणी केली असतां त्यांनीं तो मला दिला. इतकें झाल्यावर त्यांचा निरोप घेऊन आम्ही परतलों.

निघतेवेळीं त्यांनीं आपण परत जाण्याकरितां वाहनाची काय सोय केली आहे असा प्रश्न केला. आपली इच्छा असेल व आपणास अनुकूल असेल त्याप्रमाणें आपण वाहनाची तजवीज करावी असें आम्ही त्यांस सांगितलें. त्याबरोबर प्रधानानीं आपल्या वडील चिरंजीवांस आमचे-करितां दोन मोटारी व एक चौपानाची तजवीज करून देण्याची आज्ञा केली. चौकशी करितां फक्त एकच मोटार मिळण्यासारखी आहे असें चिरंजीवांनीं येऊन सांगितलें. त्यावर भीमथडीच्या दोघा इंजीनियरांपैकीं एकाची मोटार घेऊन येण्यास प्रधानानीं सुचविलें. अखेर एक मोटार व दोन घोड्यांची एक गाडी आम्हास काटमांडूहून पायथ्यापर्यंत पोहोंचविण्यास देण्यांत आली. पुढें पायथ्यापासून भीमथडीपर्यंत चौपान व सामान नेण्यासाठीं मजूर वगैरेची व्यवस्था करण्यांत आली. अशा रीतीनें प्रधानाच्या आज्ञेची अमंलबजावणी बिलकुल विलंब न लागतां करण्यांत येऊन आमच्या वाहनाची योग्य ती सर्व व्यवस्था झाली.

संस्थानांतील लायब्ररींतील हस्तलिखित ग्रंथ ( पोथ्या वगैरे ) पाहण्याची इच्छा आम्ही प्रदर्शित केल्यावरून प्राइम मिनिस्टर यांनीं आपल्या सेक्रेटरीस हुकूम करून आम्हास लायब्ररी बघण्याची संधी दिली होती. लायब्ररींत पुष्कळच हस्तलिखित ग्रंथ आमचे पाहण्यांत आले. ग्रंथांचें रजिस्टर पूर्वी एक करून ठेवलेलेंच होतें. परंतु नवीन आज तागायतपर्यंतचें रजिस्टर तयार करण्याचें काम हल्लीं सुरू आहे.

संस्थानांत इंग्रजी शिक्षणाचा फारच अभाव असल्याचें आमचे दृष्टो-त्पत्तीस आलें. पर्वतांच्या चौफेर अभेद्य तटबंदींतून पाश्चात्य संस्कृतीला

व आधुनिक कल्पनांना या पुराण प्रदेशांत शिरकाव मिळणें अर्थातच फार कठीण झालें असावें. नुकतेंच कोठें तेथें एक नवीन विद्यापीठ ( कॉलेज ) स्थापन झालें असून तें " पाटणा युनिव्हर्सिटी "स जोडण्यांत आलें आहे. विद्यार्थ्यांची संख्या हातांचे बोटांवरून मोजण्याइतकी आहे.

संस्थानांतील नाणें स्वतंत्र आहे. आम्हीही थोडें नाणें नमुन्यादाखल बरोबर आणलें आहे. इंग्रजी नाणेंहि तेथें चालतें.

संस्थानांतील नोकर वर्गांत बेंगाली लोकांचें बरेंच मोठें प्रमाण असून त्यांचें वजनहि दरबारांत चांगलें असल्याचें दिसून आलें.

महाशिवरात्रीचे दिवशीं पशुपतिनाथाचा फारच मोठा मेळा भरत असतो व त्याकरितां हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून असंख्य यात्रेकरू, साधु, बैरागी, संन्यासी, वगैरे लोक येतात. संस्थानचा मुलुख डोंगराळ असल्यानें साहजीकच यात्रेकरूंना जाण्यायेण्यास बरेच कष्ट होतात व प्रवासांत खाण्यापिण्याचे पदार्थ मिळण्याचे बाबतींतही बराच त्रास होतो. यास्तव यात्रेचे प्रसंगीं सरकारचे खास हुकुमानें प्रवाशांच्या सुखसोईकरितां रस्त्यारस्त्यावर ठिकठिकाणीं दुकानें व उपाहारगृहें उघडविण्यांत येऊन खाण्यापिण्याची, त्याचप्रमाणें मुक्काम करण्याचीही व्यवस्था करण्यांत येते. याहीपेक्षां विशेष म्हणजे काटमांडू येथें जितके म्हणून हिंदुस्तानांतील यात्रेकरू श्रीपशुपतिनाथाचे दर्शनास येतील तितक्या सर्वांची खाण्यापिण्याची व मुक्कामाची सर्व बरदास्त सरकार दरबारांतून ठेवविली जाते, व त्याप्रीत्यर्थ सरकारास दरवर्षी पुष्कळच खर्च करावा लागतो.

संस्थानांतील राज्यपद्धति पाहिली म्हणजे ती पुष्कळ अंशीं इंग्लंडांतील राज्यकारभाराशीं जुळती येते. इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें राजसत्ता नियंत्रित स्वरूपाची (limited monarchy) असून राजाच्या

नांवानेंच, परंतु वस्तुतः मुख्य प्रधानाचे मार्फत राज्यकारभार चालविला जातो. त्याचप्रमाणें नेपाळचा राजा बहुतांशीं नामधारी असून राज्य चालविण्याची सर्व जबाबदारी मुख्य प्रधानावर असते. फरक इतकाच कीं, इंग्लंडमधील प्रधान हा पार्लमेन्टमधील अत्यंत प्रबल व बहुसंख्याक पक्षाचा पुढारी असतो व नेपाळच्या मुख्य प्रधानाची गादी एकाच कुटुंबांत वंशपरंपरा चालत आलेली असते. नेपाळेश्वराला जरी अग्रपूजेचा मान असला तरी नेपाळचा खरा, परंतु अनाभिषिक्त राजा म्हटला म्हणजे तेथील मुख्य प्रधानच होय. राजासंबंधानें अत्यंत चमत्कारिक असा एक प्रघात आमचे नजरेस आला. तो असा कीं, राजाला आपल्या राज्याची चतुःसीमा ओलांडून जगांत दुसरे कोठेंही जाण्याची सक्त मनाई आहे. अशा प्रकारचें सीमोल्लंघन केल्यास त्यास राज्यसंन्यासाचें प्रायश्चित्त सांगितलें आहे. अर्थात् आजपर्यंत कोणीहि राजपुरुष बाहेरील जग पाहण्याचे लालसेनें आपल्या राज्य-पदावर पाणी सोडण्यास धजला नाहीं. कर्मधर्मसंयोगानें व कांहीं अपरिहार्य कारणामुळें हद्द सोडण्याचा प्रसंग आल्यास आपल्या जागेवर दुसऱ्या कोणाची तरी नेमणूक करून मगच त्याला तसें करतां येतें, व पुनः राज्यांत प्रवेश करणें झाल्यास गादीवरील पुरुषाचे संमतीनेंच त्याला स्वदेशीं परत येतां येतें.

येथील मजूर वर्ग अत्यंत काटक व सशक्त असा आहे. हे लोक त्या डोंगराळ व बिकट प्रदेशांतून मोठमोठीं वजनाचीं पार्सलें व भारी सामान पाठीवर बांधून सहज वाहून नेऊं शकतात. भीमथढी नदी ओलांडतांना मोटारचीं चाकें वगैरे भाग वेगळे करून वजनदार मोटारी हे उचलून नदीपार व पुढें थेट डोंगराचे पायथ्यापर्यंत घेऊन जातात.

येथील वस्ती प्रामुख्यानें हिंदूंचीच असून मुसलमान लोक फारच थोडे आहेत. शहरांत सर्व ठिकाणीं विजेची रोषनाई आहे. तिला

तेथील लोक "चंद्रज्योति" म्हणतात. रात्रौ नऊ वाजल्यानंतर शहरांत रस्त्यावरून फिरण्याची अगर बाहेरून प्रवेश करण्याची बंदी आहे. कांहीं योग्य कारणानें तसें करणें झाल्यास—उदाहरणार्थ अपरात्रीं औषधोपचाराकरितां डॉक्टरला बोलावणें झाल्यास—अगोदर पोलीसची परवानगी घ्यावी लागते.

येथील ब्यांडचे सलामीची पद्धति व्यक्तिसूचक आहे. इंग्रजी साम्राज्यांत सलामी म्हटली म्हणजे "God Save the King" ही सर्वसाधारण सर्व प्रसंगीं आहे. परंतु नेपाळमध्यें निरनिराळ्या मोठ्या व्यक्तींना निरनिराळ्या रागांतील सुरांत सलामी देण्यांत येते. सलामीचे सुरावरून व्यक्तीचा बोध सहज होतो. हे सर्व प्रकार आम्हाला अल्लाउद्दीन (हे मी निघण्यापूर्वीं बडोद्याहून एक दिवस अगोदर काटमांडूस आले) यांनीं वाजवून दाखविले.

गोवधाबद्दल पूर्वीं फांशीची शिक्षा फर्माविली जात असे. हल्लीं त्या गुन्ह्याबद्दल देहांत शिक्षा देण्याचें बंद झालें आहे व त्याबद्दल इतर कडक शिक्षा केली जाते. ब्राह्मण व स्त्रिया यांना फांशीची शिक्षा कधींहि दिली जात नसे व हल्लींहि तोच प्रघात चालू आहे.

नेपाळचे राज्यांत पोस्ट खातें स्वतंत्र आहे. ब्रिटिश हद्दींत पत्र पाठवावयाचें असल्यास अगर तार पाठविणें झाल्यास ब्रिटिश लिगेशनचे पोस्टांत जावें लागतें.

# H. H. THE PRIME MINISTER OF NEPAL HIS SONS AND DAUGHTERS

*His Highness the Maharaja*—

Swasti Shrimad-ati-prachand-Bhujadandety-odi Projjvala Nepal-tara-dhisha His Highness Maharaja Sir Chandra Shumshere Jung Bahadur Rana G. C. B., G. C. S. I., G. C. M. G., G. C. V. O., and D. C. L. etc

Honorary General British Army,
Honorary Colonel Fourth Gurkhas,
Thong-Lin-Pimma-Kokan-Wang-Syan,
Grand Officer de la Legion d' Honneur,
Prime Minister, Marshal and the Supreme Commander-in-Chief of the Nepal Forces,

( Singh Durbar, Nepal )

*Eldest Son.*—His Honour Surodipta Manyabar General Sir Mohon Shumshere Jung Bahadur Rana, K. C. I E., ( Singh Durbar Nepal )

*Secand Son.*—His Honour Supradipta Manayabar General Sir Baber Shumshere Jung Bahadur Rana, K. C. S. I., K. C. I. E., G. B. E., N.P. B., Honorary Colonel, British Army.

( Singh Durbar, Nepal )

*Third Son*—His. Honour Supradipta Manayabar Lt. General Sir Kaiser Shumsher Jung Baha- dur Rana, K. B. E,
( Kaiser Mahal, Nepal )

*Fourth Son.*—His Honour Lt. General Shingha Shumshere Jung Bahadur Rana,
( No. 1, Thapathali Durbar, Nepal )

*Fifth Son.*—His Honour Major General Krishna Shumshere Jung Bahadur Rana,
( Singha Durbar, Nepal )

*Sixth Son.*—His Honour Major General Bishnu Shumshere Jung Bahadur Rana,
( Singha Durbar, Nepal )

*Sevenih Son.*—His Honour Major General Shanker Shumshere Jung Bahadur Rana,
( Singh Durbar, Nepal )

*Eighth Son.*—His Honour Major General Madan Shumshere Jung Bahadur Rana,
( Singh Durbar, Nepal )

*Eldest Child first daughter.*—Maharani Bajang,
( Jaya Bhavan, Bangalore ).

There is one unmarried daughter of His Highness; name not known.

REFBK-0003793